रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ ▌अंक २१२ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## इम्तियाज जलील यांच्या वाहनावर हल्ला

**छ.संभाजीनगर:** एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांच्या वाहनावर बुधवारी (दि.७) हल्ला करण्यात आला. जलील यांच्या वाहनावर हल्ला केल्यानंतर वातावरण चांगलंच तापलं आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये इम्तियाज जलील यांचा प्रचार सुरू असतानाच ही घटना घडली. नाराज कार्यकर्त्यांनी जलील यांच्या वाहनावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. महापालिका निवडणुकीत जुन्या कार्यकर्त्यांना डावलुन नव्या लोकांना संधी देण्यात आली, असा आरोप करत नाराज कार्यकर्त्यांनी जलील यांच्या वाहनावर हल्ला केल्याची माहिती समोर येत आहे.


# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ८ जानेवारी २०२६

किंमत ४ ₹



ऑफीस कामाकरिता अनुभवी मुलगी/महिला पाहिजे.


पात्रता – .B.com, Typing, MS-CIT

पगार – १२०००–१५०००

पत्ता – नांदईपाडा, झिराड, अलिबाग–रायगड

संपर्क क्र. ९८२२०८३३५३, ८४०७९८२७१२


# आमदारांची कृपा, मुरुडमध्ये महाघोटाळा






**| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |**

**रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यात बेकायदेशीर दगड, माती आणि मुरुम उत्खननाचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, राज्याच्या महसूल मंत्र्यांनी याप्रकरणी तात्काळ कारवाई करण्याचे आदेश देऊनही स्थानिक प्रशासनाने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा गंभीर आरोप होत आहे. या अनधिकृत कामाच्या उद्घाटन प्रसंगी खुद्द अलिबागचे आमदार महेंद्र दळवी उपस्थित राहिल्याने या भ्रष्टाचारात आमदारांचीही मिलिभगत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात आला आहे. या उत्खननासाठी महसूल विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ यापैकी कोणतीही परवानगी घेतलेली नाही असे म्हणणेही तक्रारदार यांनी मांडले आहे. या भ्रष्ट कारभाराविरोधात आता ग्रामस्थ आक्रमक झाले असून, येत्या १३ जानेवारी २०२६ पासून मुरुड तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा महेश जानू ठाकूर यांनी दिला आहे.**

### 1. जिल्हाधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

चिंचघर ग्रामस्थांच्या वतीने ११ नोव्हेंबर २०२५ रोजी महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना उसडी गावातील अनधिकृत उत्खननाबाबत निवेदन देण्यात आले होते. उत्खननामुळे होणारा त्रास तसेच धोका ग्रामस्थांनी त्यांना सांगितला होता. त्यावेळी ७ दिवसांत तातडीने कारवाई करण्याचे आदेश महसूल मंत्र्यांनी दिले होते. मात्र अद्यापही त्यावर कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी किसन जावळे या प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यावरुन मंत्र्यांच्या आदेशालाही जिल्हाधिकाऱ्यांच्या मते काही किंमत नसल्याचे समोर आले आहे.

> “नियमानूसार दंड भरला नसला तरी अतिरिक्त परवानगी देता येते. नियमानूसारच त्यांना २०० ब्रास उत्खननाची परवानगी देण्यात आली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कारवाईचे आदेश दिले होते. त्यानूसार चौकशी सुरु आहे. शासकिय जमिनीत उत्खनन केले असल्यास निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. जमिनीच्या सीमा तपासण्यात येतील. त्याबाबतचा अहवाल मंडळ अधिकाऱ्यांकडून आल्यानंतरच कारवाई करण्यात येईल. याशिवाय अस्लम कादिरी यांना ५८ लाख रुपयांचा दंड लावण्यात आला आहे. त्यासाठी त्यांना नोटीसही बजावण्यात आली आहे. यावर त्यांनी खुलासा दिला आहे.”
>
> **– अजय डफळ,** तहसीलदार, मुरुड

### 2. प्रकरणातील महत्त्वाचे मुद्दे: २५–३० वर्षांपासून लूट

मुरुड तालुक्यातील उसडी येथील गट नं. १७० मध्ये अस्लम इस्माईल कादिरी या व्यक्तीकडून गेल्या २५ ते ३० वर्षांपासून बेकायदेशीरपणे दगड, माती आणि मुरुमाचे उत्खनन सुरू आहे.

### 3. पर्यावरणाचा ऱ्हास आणि गावाला धोका

या बेकायदेशीर खाणकामामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाली असून निसर्गाचा ऱ्हास होत आहे. स्फोटकांमुळे ग्रामस्थांच्या घरांना तडे गेले असून भविष्यात दरड कोसळण्याचा धोकाही निर्माण झाला आहे. याप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा आणि त्यांचे निलंबन करावे, अशी मागणी आता जोर धरत आहे. प्रशासकीय दिरंगाईमुळे आता हा लढा मंत्रालयापर्यंत पोहोचला

### 4. मुरुडमधील अधिकारी–कर्मचाऱ्यांचे साटेलोटे

या अवैध व्यवसायात महसूल विभाग, वन विभाग आणि ग्रामपंचायत स्तरावरील अधिकाऱ्यांचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष लागेबांधे असल्याचा संशय तक्रारदाराने व्यक्त केला आहे. ग्रामस्थांना अंधारात ठेवून ग्रामपंचायतीचा नाहरकत दाखला मिळवण्यात आला होता, जो नंतर ग्रामसभेने रद्द केला आहे.

### 5. शासकीय जमिनीवर केले अतिक्रमण

आरोपीने केवळ स्वतःच्या जमिनीवरच नाही, तर गट नं. ११८ आणि ११९ या शासकीय जमिनींमधूनही १० ते १५ वर्षांपासून लुटमार सुरू केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे तहसीलदारांवर दबाव आहे कि, ते अर्थपूर्ण हितसंबंध जोपासत आहेत, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

### 6 ५८ लाखांचा दंड, कादिरी यांना नोटीस

प्रशासनाने अस्लम कादिरी यांना माती आणि मुरुम उत्खननापोटी ५८,३०,५०० रुपयांचा दंड ठोठावला आहे. मात्र, यात दगडाच्या मोठ्या प्रमाणावरील उत्खननाचा उल्लेखच टाळण्यात आला आहे. तसेच, बाजारात एका ब्रासचे दर ६००० ते ६५००० रुपयांच्या घरात असताना अतिशय तुटपुंजा दंड आकारून महसुलाचे मोठे नुकसान केले जात आहे.

### 7. मंत्र्यांच्या आदेशाला केराची टोपली

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ११ नोव्हेंबर २०२५ रोजी या प्रकरणावर ७ दिवसांत तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले होते. मात्र, दोन महिने उलटूनही जिल्हाधिकारी किंवा तहसीलदार कार्यालयाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

# वृक्षतोडीबाबत शेकाप आक्रमक

## तालुका चिटणीस सुरेश घरत यांची वन अधिकारी यांच्याकडे तक्रार




**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील सहाण बायपास परिसरातील रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या झाडांची कत्तल करण्यात आली आहे. विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात झाडांची तोड झाली आहे. वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडण्याचा धोका निर्माण झाला आहे. या वृक्षतोडीबाबत शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला आहे. शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी उपवनसंरक्षक राहुल पाटील यांची भेट घेऊन वृक्षतोडीविरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

सुरेश घरत यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र भूषण डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीनानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने अलिबाग तालुक्यातील रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून सुरु आहे. सहाण बायपास परिसरातील रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे काही कंपन्यांकडून तोडण्याचे काम करण्यात आले आहे.

## पॅरोलसाठी अबू सालेम हायकोर्टात

**| मुंबई | प्रतिनिधी |**

कुख्यात गुंड अबू सालेमने मोठा भाऊ अबू हाकिम अन्सारीच्या निधनानंतर तातडीच्या पॅरोलसाठी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्या याचिकेची दखल घेऊन मंगळवारी (दि.६) न्यायालयाने सरकारला भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले.अबू सालेमचा मोठा भाऊ अबू हाकिम अन्सारीचे १४ नोव्हेंबर २०२५ रोजी निधन झाले. मोठा भाऊ आपल्यासाठी पितृतुल्य होते. त्याच्या चाळीसाव्या दिवसाच्या विधीसाठी उपस्थित राहण्यासाठी, कुराण पठणात भाग घेण्यासाठी तसेच कुटुंबातील सदस्यांना भेटण्यासाठी अबू सालेमने उत्तर प्रदेशातील आझमगढ येथे जाण्याची परवानगी मागितली आहे. त्याच्या अर्जावर मंगळवारी न्या. अजय गडकरी आणि न्या. रणजित भोसले यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

# पहिल्या टप्प्यात होणार रायगडच्या निवडणुका

## राज्यातील १२ जिल्हा परिषदांचा समावेश

**| रायगड | प्रतिनिधी |**

महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या कामाला वेग आला असून पुढील आठवड्यात या निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. मात्र, ५० टक्के आरक्षणाची मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हा परिषदांच्या निवडणूक पहिल्या टप्प्यात घेण्याचा निवडणूक आयोगाचा विचार सुरू असून यामध्ये रायगड जिल्ह्याचा समावेश आहे.

राज्यात एकूण ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्या आहेत. यापैकी १७ जिल्हा परिषदा आणि ८८ पंचायत समित्यांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांहून अधिक असल्याने या मर्यादेत आरक्षण असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे नियोजन राज्य निवडणूक आयोगाकडून करण्यात येत आहे.

पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर, तर कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग, तर छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशीव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदांच्या निवडणूक पहिल्या टप्प्यात होणार आहेत. त्याचप्रमाणे उर्वरित जिल्हा परिषदांच्या निवडणुका न्यायालयाच्या आदेशानुसार दुसऱ्या टप्प्यात होतील.

## बस-दुचाकी अपघातात मुलाचा मृत्यू

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव तालुक्यात अपघाताचे सत्र सुरूच आहे. दिघी पुणे महामार्गावरील मोर्बा रोडवर ट्रॅव्हलर बस व दुचाकीमध्ये अपघात होऊन आठ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, दि. ७ जानेवारी रोजी तक्रारदार यांचा मुलगा आरुष समिर गुगले, वय ८ वर्षे व त्यांचे सासरे शांताराम गुगले, रा. निलगुण, पो. बामणोली, असे होंडा प्लेझर स्कुटी क्र एम.एच.०६ सी. जे.२०६३ ने माणगाव शहरातील मोर्बा रोडवरील साई सायकल मार्ट माणगाव येथे मृत मुलाचा सायकलचा टायर दुरुस्त करण्याकरिता दिला असल्याने तो •> पान २ वर

## २६ गाव योजनेतील कामात भ्रष्टाचार : राजेंद्र मळेकर

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यात ४० वर्षापुर्वी धाटाव एमआयडीसी आली. एमआयडीसी आल्यानंतर नदीचे पाणी प्रदुषित झाले आहे. त्यामुळे योग्य पाणी मिळावे, यासाठी ग्रामस्थांनी एकत्र येऊन मागणी केली होती.

त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत २६ गाव पाणी योजना मंजूर झाली. परंतु आजही २६ गावांमध्ये पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. दीड ते दोन किलो मीटर पायपीट करीत गावांतील महिला डोक्यावर हंडे घेऊन पाणी आणत आहेत. पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे.

२६ गाव योजनेचे काम सुरु झाले नाही. परंतु ठेकेदाराने निम्मे बील काढले असा आरोप आरे बुद्रुक ग्रामपंचायीचे सरपंच राजेंद्र मळेकर यांनी केला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून माहिती दिली जात नाही. पाईप असूनही ते टाकण्यात आले नाहीत. गावांमध्ये काम प्रलंबित आहे. करोडो रुपये येऊनही महिलांच्या समस्या तशाच आहेत. या योजेनच्या कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा आरोप आहे. त्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी. या प्रश्नाबाबत शेकाप आक्रमक असून आगामी काळात रोह्यात शेकापमार्फत तीव्र आंदोलन केले जाणार, असा इशारा मळेकर यांनी दिला आहे.

# तरुणांना नोकरी मिळालीच पाहिजे

## शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील आक्रमक




- **युवा प्रशिक्षणार्थी योजनेतील तरुणांवर कोसळले बेकारीचे संकट**
- **निवडणूक झाल्यावर त्यांना नोकरीवरून काढण्याचा प्रताप**
- **ठोस भूमिका घेण्यास सरकार उदासीन**

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

विधानसभा निवडणुकीच्या कालावधीत तरुणांना अमिष दाखवून युवा प्रशिणार्थी योजना राबविण्यात आली. आता मात्र या तरुणांना डावलण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.त्यांना बाजूला सारले जात आहे. या तरुणांवर बेरोजगारीचे संकट उभे राहिले आहे. शासनाने युवांकडून मते मिळविण्यासाठी राबविलेली ही योजना फसवी असल्याचा आरोप होत आहे. सरकारने लवकरात लवकर युवकांसाठी ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. शेकाप युवकांच्या पाठीशी आहे. गोरगरींबाना रोजगार मिळाला पाहिजे. त्यांना सेवेत रुजू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यासाठी रस्त्यावर उतरून सरकाराला जाब विचारला जाईल, अशी संतप्त प्रतिक्रीया शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केली.

अलिबागमधील शेतकरी भवन येथील सभागृहात बुधवारी (दि.७) पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी चित्रलेखा पाटील बोलत होत्या.

यावेळी शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, पुरोगामी युवक संघटना तालुका अध्यक्ष विक्रांत वार्डे, रायगड जिल्हा युवा प्रशिणार्थी संघटनेचे जिल्हाध्यक्ष ऋषीकेश पवार, पदाधिकारी, •> पान २ वर

> “मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी बेरोजगार ही योजना ९ जुलै २०२४ पासून राबविण्यात आली. सहा महिन्याचा कार्यकाल देण्यात आला. त्यानंतर मागणीनुसार, अलिबागमध्ये जानेवारी २०२५ मध्ये पाच महिन्याची मुदत वाढवून दिली. त्यामध्ये रोजगाराची शाश्वती दिसून आली नाही. शासनाची कोणतीही ठोस भूमिका नाही. निधी अभावी नियुक्त करण्यास टाळाटाळ केली जात आहे. अनेक वेळा ठिकठिकाणी आंदोलन करण्यात आले. आश्वासने देण्यात आले. परंतु प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यात आली नाही.”
>
> – ऋषीकेश पवार, युवा प्रशिक्षणार्थी संघटना रायगड जिल्हा

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत उपक्रम** | **एकाच दिवशी ७७८ ठिकाणी वनराई बंधारे उभारणी**

# रायगड जिल्हा जलसमृद्धीच्या दिशेने

**| रायगड | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची संपूर्ण रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या नेतृत्वाखाली प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी बुधवारी (दि.७) या एकाच दिवशी श्रमदान कार्यक्रम राबवून ७७८ ठिकाणी वनराई बंधारे बांधण्यात आले. यामुळे ग्रामपंचायती जलसमृद्ध होण्यास मदत होणार असून त्यांची पाण्याची समस्या दूर होणार आहे.

| तालुका | ग्रामपंचायतींची संख्या | वनराई बंधा-यांची संख्या |
|---|---|---|
| अलिबाग | ६२ | ६२ |
| कर्जत | ५५ | ५९ |
| खालूापर | ४५ | ४४ |
| महाड | १३४ | ८३ |
| माणगाव | ७४ | ५ |
| म्हसळा | ३९ | ३९ |
| मुरूड | २४ | ५० |
| पनवेल | ७१ | ७० |
| पेण | ६५ | ७२ |
| पोलादपूर | ४२ | ३३ |
| रोहा | ६४ | ६१ |
| श्रीवर्धन | ४३ | ३९ |
| सुधागड | ३३ | ३६ |
| तळा | २५ | ३९ |
| उरण | ३५ | ४ |

एकूण ग्रामपंचायती: ८११

एकूण वनराई बंधाऱ्यांची संख्या: ७७८

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत हा विशेष उपक्रम जिल्हाभरात राबविण्यात आला आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश पावसाचे पाणी अडवून भूजल पातळी वाढवणे, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता •> पान २ वर



## उत्तर भारतीयांची मराठी कुटुंबाला मारहाण

**| दहिसर | वृत्तसंस्था |**

मुंबई महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरु आहे. मात्र यादरम्यान एक धक्कादायक घटना घडली.

दहिसरमध्ये उत्तर भारतीयांनी मराठी आदिवासी कुटुंबाच्या घरात घुसून त्यांना मारहाण केली आहे. या प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे. याप्रकरणी आठ ते दहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवसेनेच्या (शिंदे गट) उमेदवाराच्या प्रचारासाठी गेलेल्या कार्यकर्त्यांनी स्थानिक रहिवासी विजय पाटील आणि त्यांच्या कुटुंबाला घरात घुसून बेदम मारहाण केल्याचा आरोप मराठी आदिवासी कुटुंबाने केला आहे. •> पान २ वर

# हत्या करणाऱ्यास आठ वर्षे सक्तमजुरी

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

भांडणाचा राग मनात धरून अजय संतोष वाघमारे याची हत्या केल्याच्या प्रकरणात आरोपी राहुल उदय वाघमारे यास अलिबाग येथील प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश आर. डी. सावंत यांनी सोमवारी (दि.५) दोषी ठरवून आठ वर्षे सक्त मजुरी व पाच हजार रुपये द्रव्य दंडाची शिक्षा सुनावली आहे.

हत्येची ही घटना अलिबाग तालुक्यातील बुरुमखाण आदिवासी वाडी, वरसोली या गावाच्या हद्दीत एप्रिल २०२४ मध्ये घडली होती. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले तपासनिक अधिकारी व सध्या नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि सचिन कुलकर्णी यांची साक्ष महत्त्वाची ठरली.

२२ एप्रिल, २०२४ रोजी रात्री आठ वाजताच्या सुमारास बुरुम खाण आदिवासी वाडीच्या हद्दीत घडलेल्या या गुन्ह्यातील फिर्यादी अर्चना अजय वाघमारे यांचे सासरे संतोष बाळू वाघमारे व आरोपी राहुल वाघमारे यांच्यामध्ये शाब्दिक वाद होऊन भांडण झाले होते. भांडण सोडविण्यासाठी फिर्यादी यांचे पती अजय संतोष वाघमारे हे गेले असता आरोपी राहुल वाघमारे याने वाघमारे यांचा गळा दोन्ही हाताने पकडून त्यांना जीवानिशी ठार मारले होते. त्यानंतर फिर्यादी अर्चना वाघमारे यांच्याकडून तक्रार दाखल करण्यात आली होती. •> पान २ वर

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# बोरगाव शाळेची परसबाग सरस

। खरोशी । वार्ताहर ।

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात अंतर्गत रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरगाव,ता.पेणया प्रशालेने सन २०२५-२६ या वर्षात परसबाग स्पर्धेत पेण तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला.

शालेय परिसरात परसबाग विकसित करून परसबागेत विविध प्रकारच्या फळभाज्या, पालेभाज्या, फळझाडे, औषधी वनस्पतींची लागवड केली आहे. शालेय परिसरात सेंद्रिय खत निर्मिती करून त्याचा वापर भाज्या उत्पादित केल्या जातात व त्या भाज्यांचा वापर मध्यान्ह भोजनासाठी केला जातो. परसबागेत विविध प्रकारची फळझाडे, फुलझाडे, औषधी वनस्पती असून प्रत्येक झाडाला विद्यार्थ्यांची नावे दिली आहेत. त्या झाडांची संगोपनाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.झाडांना कोड असून त्या झाडांची माहिती मोबाईलद्वारे स्कॅन करुन मिळविता येते. तसेच विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी प्रत्येक झाडाला म्हणी, स्लोगन पाट्या लावण्यात आल्या आहेत.पर्यावरणाचे रक्षण व शेतीविषयक सखोल माहिती या अनुषंगाने विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्या मदतीने अत्यंत उत्कृष्ट व विविधता असलेली परसबाग फुलविण्यात आली आहे. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक महेश पाटील, सहशिक्षिका संगिता काळे व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. शाळेला परसबाग स्पर्धेत तालुका स्तरावर प्रथम क्रमांक मिळाला.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शालेय परिसरात परसबाग विकसित करणेबाबत अनेक शाळामधून मोठ्या प्रमाणात शाळा व्यवस्थापन समिती, पालक व शिक्षक यांनी संयुक्त प्रयत्नाने परसबाग विकसित केलेल्या आहेत.

विकसित करण्यात आलेल्या परसबागेतील उत्पादित भाजीपाल्याचा समावेश आहारामध्ये करण्यात येत आहे.




> ग्रामीण भागातील बोरगाव सारख्या शाळेमध्ये परसबाग तयार करण्याकरता माझ्या शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक पालक ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे, अरुणादेवी मोरे पोषण आहार अधिक्षक केंद्रप्रमुख मोलाचे मार्गदर्शन लाभले.
>
> – महेश पाटील
> मुख्याध्यापक बोरगाव शाळा

> शासनाने उत्कृष्ट परसबागांची केंद्र निहाय, तालुकास्तरीय स्पर्धा घेवून प्रथम तीन क्रमांक जिल्हा स्तरावर पाठवण्यात येत आहेत यामध्ये प्रथम क्रमांक रायगड जिल्हा परिषद बोरगावशाळा, द्वितीय क्रमांक रायगड जिल्हा परिषद मायनी कोयना, तृतीय क्रमांक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रोडे तर प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून रायगड जिल्हा परिषद खरोशी गंगेचीवाडी आणि तिलोरे या शाळांचे गुणानुक्रमे नंबर आले आहेत.
>
> – शर्मिला शेंडे
> गट शिक्षणाधिकारी
> पंचायत समिती पेण

## प्रकाश अकोलकर यांना जीवनगौरव

**मुंबई :** मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. कृ. पां. सामक हा प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार प्रकाश अकोलकर यांना जाहीर करण्यात आला आहे. राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारासाठी अशोक अडसूळ यांची तर वृत्तवाहिनीसाठी राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारासाठी आज तक ग्रुपचे ओमकार वाबळे यांची निवड करण्यात आली आहे. वार्ताहर संघाच्या सदस्यांसाठी असलेल्या उत्कृष्ट पुरस्कार बाळासाहेब पाटील यांना जाहीर झाला आहे. पत्रकार दिनाचे औचित्य साधून आज या पुरस्कारांची घोषणा वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे यांनी केली. अभय देशपांडे, प्रकाश सावंत, सुजित महामुलकर यांनी नावांची पुरस्कारासाठी केलेली शिफारस वार्ताहर संघाच्या कार्यकारिणीने मान्य केली.

## तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

। रोहा/धाटाव । प्रतिनिधी ।

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी केंद्रीय अर्थमंत्रिपदाचा राजीनामा देणारे, जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे स्थापक, रिझर्व्ह बँकेचे पहिले भारतीय गव्हर्नर तसेच थोर अर्थतज्ज्ञ डॉ. सी. डी. देशमुख (चिंतामणराव देशमुख) यांच्या १३० व्या जयंतीनिमित्त रोहा येथे तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा रोहा प्रेस क्लबच्या पुढाकाराने व विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत असून, बुधवारी दि. १४ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत राम मारुती चौक, रोहा (रायगड) येथे संपन्न होणार असल्याचे आयोजकांनी कळविले आहे.

या वक्तृत्व स्पर्धेमध्ये इयत्ता ८ वी ते १० वी तसेच ११ वी ते कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे. स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांना व युवकांना सामाजिक, शैक्षणिक व राष्ट्रीय विषयांवर आपले विचार मांडण्याची संधी मिळणार आहे, असे आयोजकांनी कळविले आहे.

स्पर्धेसाठी विविध समकालीन विषय देण्यात आले असून प्रत्येक स्पर्धकास मर्यादित वेळेत आपले मत मांडावे लागणार आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश युवकांमधील वैचारिक क्षमता, सामाजिक भान व राष्ट्रभक्तीला चालना देणे हा आहे.या कार्यक्रमासाठी रोहा प्रेस क्लबचे पदाधिकारी, मार्गदर्शक तसेच विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. परिसरातील विद्यार्थ्यांनी, युवक-युवतींनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पेप्सी बॉटल्स वाहतूक करणारा कंटेनर कलंडला

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ वरील धोकादायक वळणे चौपदरीकरणानंतर देखील कायम राहिल्याने कशेडी घाटातून मुंबईकडे पेप्सी बॉटल्स वाहतूक करणारा कंटेनर कलंडला. त्यामुळे मार्गावरील एक लेन पूर्ण बंद झाली होती. बुधवारी (दि.७) सकाळी झालेल्या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.



लोटे ते भिवंडी वाडापर्यंत पेप्सी बॉटल्स वाहतूक करणारा कंटेनर चालक राम आचल मिंद (रा.उत्तर प्रदेश) हा आपल्या ताब्यातील कंटेनर (क्रमांक एमएच ४३ जीई २२४४) घेऊन जात होता. कशेडी घाटामध्ये पोलादपूर नजिक चोळई गावच्या हद्दीतील तीव्र उताराच्या वळणावर आला असता चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. त्यामुळे कंटेनर कलंडल्याने कंटेनरमधील पेप्सीच्या बॉटल महामार्गावर सर्वत्र अस्ताव्यस्त पसरल्या.

या अपघाताची माहिती पोलादपूर पोलिसांना समजताच पोलीस उपनिरीक्षक मंगेश मुंढे यांनी पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. यावेळी कशेडी महामार्ग पोलीसदेखील घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर महामार्गावरील वाहतूक पोलादपूर ते गोवा दिशेने जाणाऱ्या एकाच लेनवर वळवून सुरू ठेवण्यात आली होती. त्यामुळे महामार्गावर वाहतुकीची कोंडी निर्माण झाली नाही. अपघात झालेल्या कंटेनरमधील महामार्गावर पसरलेल्या पेप्सी बॉटल बाजूला करण्याचे व क्रेनच्या सहाय्याने कंटेनर रस्त्याबाहेर करण्याचे काम पोलिसांच्या देखरेखीखाली करण्यात आले.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुरू झाल्यानंतर कशेडी घाटातील अपघातप्रवण क्षेत्र असलेली धोकादायक तीव्र उतार आणि वळणे काढण्यात आली नाहीत.

## विवाहिता बेपत्ता

**पनवेल** : राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक विवाहिता कोठे तरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. प्रतीक्षा गायकवाड असे या महिलेचे नाव असून तिची उंची अंदाजे ५ फुट, रंग गोरा, चेहरा गोल, केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा गोल, बांधा मजबुत, अंगात नेसुन पोपटी रंगाचा ड्रेस व काळया रंगाची ओढणी तसेच मराठी भाषा बोलणारी सोबत सॅमसंग कंपनीचा मोबाईल आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोहवा श्रीपत घरत यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रस्त्याची सफाई

### तरुणांच्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक

। उरण । प्रतिनिधी ।

तालुक्यातील पिरकोन-वशेणी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात माती, खडी, मुरुम पडल्याने या रस्त्यावरुन दुचाकी, रिक्षा घेऊन जाणेही कठीण बनले होते. मात्र, प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही किंवा उपाययोजना होईल याची वाट न बघता सारडे गावातील नितीन म्हात्रे, त्रिजन पाटील आणि पाले गावातील हरिश म्हात्रे यांनी स्वत:च पुढाकार घेऊन श्रमदान करून सदर रस्त्याची साफसफाई केली. त्यांच्या या समाजाभिमुख कामाबद्दल सामाजिक कार्यकर्ते नागेश म्हात्रे व प्रवासी नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.



उरण, पनवेल तालुक्याचा विकास झपाट्याने होत आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांच्या वर्दळीबरोबर माती, खडी, मुरुम भरलेले डंपरची अवैधरित्या वाहतूक राजरोसपणे रात्री-अपरात्री सुरू असते. अशा वाहनांमधील माती, खडी, मुरुम रस्त्यावर पडल्याने दुचाकीला व इतर वाहनांना अपघाताला सामोरे जावे लागत आहे. त्यात निष्पाप लोकांचा नाहक बळी जातो. या सर्व घटनेची दखल, स्थानिक ग्रामपंचायत, सार्वजनिक बांधकाम विभाग, सिडको, तहसील कार्यालय तसेच संबंधित प्रशासन घेत नसल्याने तालुक्यातील रस्त्यांवर सर्रासपणे माती, खडी, मुरुम पडल्याचे चित्र दिसून येत आहे.

पिरकोन-वशेणी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात माती, खडी, मुरुम पडल्याने या रस्त्यावरुन दुचाकी, रिक्षा घेऊन जाणेही कठीण बनले होते. सारडे गावातील नितीन म्हात्रे,त्रिजन पाटील आणि पाले गावातील हरिश म्हात्रे यांनी अपघाताला कारणीभूत ठरु पाहणाऱ्या सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन स्वत:च श्रमदान करून सदर रस्त्याच्या साफसफाईचे काम हाती घेतले.

## रस्त्यात घेरून युवकाची हत्या

**पनवेल :** नवी मुंबईतील एपीएमसी पोलीस ठाणे क्षेत्रात जुन्या वादातून एका युवकाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. ही घटना मंगळवारी (दि.६) रात्री घडली. यात दहा ते बारा जणांनी मिळून एकाला घेरले. सर्वांनी त्याला बेदम चोप देत शस्त्रांचे सपासप वार केले. ती व्यक्ती निपचित पडल्यावर सर्वांनी पळ काढला. या प्रकरणी पोलिसांनी रातोरात काही जणांना ताब्यात घेतले.

लकी शेख, अरहम पटेल, प्रकाश सिंग उर्फ चपटी, अजय निर्मल, वसीम राईं, सोहेम शेख, साहिल उर्फ प्रायवेट, सुफियान खान उर्फ बंबय्या, अपसर पटेल, अमीन खान उर्फ कालिया, मोहम्मद शेख आणि अन्य असे यातील संशयित आरोपींची नावे आहेत. तर अमित यादव असे मृत व्यक्तीचे नाव आहे. मयत यादव आणि संशयित आरोपी हे मूळचे उत्तरप्रदेश येथील असून गेल्या काही वर्षांपासून खैरणे गाव भागात असणाऱ्या कोपरी गाव परिसरातील राहण्यास आहेत. यादव आणि संशयित आरोपी यांच्यात काही जुने किरकोळ वाद होते. हे वाद मिटवण्यात आले होते. दरम्यान जखमी यादव याला वाशीतील प्रथम संदर्भ रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## गटविकास अधिकाऱ्यांचे वनराई बंधाऱ्यासाठी श्रमदान

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यामध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत सर्व ग्रामपंचायतींमध्ये अभियान राबवण्यात आले आहे. या अभियानामध्ये ज्या ग्रामपंचायत आहेत त्या ग्रामपंचायत मधील जंगलामध्ये असणारे वनराई बंधारे हे श्रमदानातून बांधण्यात यावे अशी योजना राबविण्यात आलेली आहे.



गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांनी माणगाव तर्फे वरेडी ग्रामपंचायत मधील बेकरेवाडीमध्ये श्रमदान करून वनराई बंधारा बांधला.

माथेरानच्या डोंगरच्या कुशीत वसलेले बेकरे ठाकूरवाडी आदिवासी वाडी या वाडीमध्ये जाण्यासाठी पक्या स्वरूपाचा रस्ता सुद्धा नाही या वाडीमध्ये जाण्यासाठी कच्या स्वरूपाचा रस्ता आहे.या ठिकाणी कर्जत पंचायत समिती गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांनी आज मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत वनराई बंधारे हि योजना राबण्यात आली. यामध्ये पंचायत समिती गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांसकडून श्रमदान करण्यात आले .यामध्ये जंगलामध्ये असणार वन्य प्राणी यांना पिण्यासाठी पाण्याची सोय कशाप्रकारे होईल. यासाठी श्रमदान करण्याचे ठरवले.

## पान १ वरून

### वृक्षतोडीबाबत शेकाप आक्रमक

श्रीनानासाहेब प्रतिष्ठानच्या माध्यमातून करण्यात आलेले पर्यावरणपूरक कार्य उध्वस्त करण्याचा घाट घालण्यात आला आहे. वृक्षतोडीची अधिकृत परवानगी असल्याचे भासविले जात आहे. विकासाच्या नावाखाली ही वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे तोडण्यात आलेल्या वृक्षांचे पूर्नवसन करण्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी निवेदनातून उपस्थित केला आहे. याप्रकरणी दोषी असणाऱ्यांविरोधात कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

### तरुणांना नोकरी मिळालीच पाहिजे

सदस्य व शेकाप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, निवडणुकीच्या पूर्वी शासनाने मुख्यमंत्री युवा प्रशिणार्थी योजना सुरु केली. अनेक तरुणांना शासकीय सेवेत कंत्राटी स्वरुपात घेतले. परंतु निवडणूक संपल्यावर या तरुणांना डावलण्यात आले. तरुणांना नोकरीचे अमिष दाखवून मते मिळविली. मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी योजनेअंतर्गत सुरुवातीला कामे दिली. आता मात्र त्यांना नोकरीमध्ये घेतले जात नाही. राज्यासह जिल्ह्यात अनेक सरकारी कार्यालयात जागा रिक्त आहेत. अनेक तरुण बेरोजगार आहेत. सरकारने आशावाद दाखविला. परंतु आता तरुण भरकटलेला आहे. राज्यातील १ लाख ३४ हजार तरुण बेरोजगार आहेत. त्यात रायगड जिल्हयातील ६९३ तरुणांचा समावेश आहे. या योजनेसाठी निधी नसल्याने त्यांना आता कामावर घेतले जात नाही. ही मोठी चिंताजनक परिस्थिती आहे. शासनाने तरुणांची फसवणूक केली आहे. हे शेतकरी कामगार पक्ष कदापी सहन करणार नाही. या तरुणांना कामावर पुन्हा सामावून घ्या, अशी मागणी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी करीत शासनाच्या विरोधात संताप व्यक्त केला.

### हत्या करणाऱ्यास आठ वर्षे सक्तमजुरी

त्यानंतर राहुल वाघमारे याच्यावर भारतीय दंड विधान कलम ३०२ अन्वये अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

याप्रकरणी प्रभारी अधिकारी, सपोनि सचिन कुलकर्णी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जलद गतीने तपास पूर्ण करून मोलाचे सहकार्य केले होते. या प्रकरणात शासकीय अभियोक्ता संतोष पवार यांनी एकूण १२ साक्षीदार तपासून दमदार युक्तिवाद केला. यामध्ये फिर्यादी, साक्षीदार व तपासकीय अधिकारी असलेले सपोनि सचिन कुलकर्णी यांची साक्ष महत्त्वाची ठरली. तसेच याप्रकरणी पैरवी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक सुनील डोंगरे, पैरवी कर्मचारी पो. ह. सचिन खैरनार, पो.ह. प्रवीण पाटील यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

### उत्तर भारतीयांची मराठी कुटुंबाला मारहाण

या प्रकरणी एमएचबी कॉलनी पोलिसांनी ८ ते १० जणांवर गुन्हा दाखल केला असून, दोघांना अटक करण्यात आली आहे. मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि.५) संध्याकाळी सुमारे ६.३० वाजता विजय पाटील (वय ३१) हे सुरक्षा रक्षक म्हणून काम करणारे आणि त्यांचा भाऊ प्रशांत हे घरी होते. त्यावेळी सूरज पांडे आणि सूरज यादव हे दोघे परवानगी न घेता घरात घुसले आणि निवडणूक प्रचार सुरू केला. पाटील यांनी याला आक्षेप घेऊन घरातून बाहेर जाण्यास सांगितले असता, आरोपींनी फोन करून त्यांच्या ८-१० सहकाऱ्यांना बोलावून घेतले.

यानंतर अजय मौर्या, दशरथ पाल, राकेश यादव, दिनानाथ यादव, सभय यादव, पप्पू यादव, मेहिलाल यादव, नीलम पांडे आदींनी पाटील बंधूंना घराबाहेर ओढून मारहाण केली. राकेश यादव याने बांबूने हल्ला केल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. आरोपींनी पाटील यांच्या पत्नीला धमक्या दिल्या आणि अश्लील भाषा वापरल्याचा आरोप आहे.

ही घटना शिंदे गटाच्या उमेदवार रेखा राम यादव यांच्या प्रचार फेरीदरम्यान घडली असून, वॉर्ड क्रमांक १ मधील विठ्ठलवाडी सोसायटी परिसरात ही मारहाण झाली. पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

### रायगड जिल्हा जलसमृद्धीच्या दिशेने

सुधारणे तसेच ग्रामीण भागात जलसंधारणास चालना देणे हा आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये ग्रामपंचायती, लोकप्रतिनिधी, अधिकारी व ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागातून हा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

यानिमित्ताने मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भासले, प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे यांनी महाड व पोलादपूर तालुक्यात बांधण्यात आलेल्या वनराई बंधाऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. त्याचप्रमाणे येथील विविध ग्रामपंचायतींना भेट देत समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा आढावा घेऊन ग्रामस्थांशी संवाद साधला.

मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी (पंचायत) , सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांनी उपक्रम यशस्वीपणे राबविल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची मुदत शासनाने वाढविली असल्याने रायगड जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीनी अशाच उत्स्फूर्तपणे व नियोजनबद्ध पद्धतीने उर्वरित कामे पूर्ण करावीत असे आवाहन केले.

### बस-दुचाकी अपघातात मुलाचा मृत्यू

आणण्याकरीता आल्यावेळी दुपारी १.३० वा च्या सुमारास माणगाव बाजुकडुन मोर्बा बाजू कडे येणारी बस क्र. एम. एच. १२ वाय. बी.७१४८ वरील चालक आरोपी सूरज मच्छिंद्र पवार, वय २७ याने अतीवेगाने येउन रोडच्या साईडला उभे असलेल्या होंडा प्लेझर स्कुटीला ठोकर मारुन अपघात केला. या अपघातात आरुष समिर गुगले याला लहान मोठया स्वरुपाच्या दुखापती होउन त्याचा मृत्यू झाला. तसेच तक्रारदार यांना देखील दुखापत झाली असून दोन्ही वाहनाच्या नुकसान झाले आहे.

या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास पो. नि. निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली स. पो. नि. बेलदार करीत आहेत.

## पीएनपी इंग्लिश शाळेत पोलीस रेझिंग डे उपक्रम

। वावोशी । प्रतिनिधी ।

खालापूर पोलीस ठाण्याच्या वतीने पोलीस रेझिंग डे निमित्त २ ते ८ जानेवारी दरम्यान महिला व बाल सुरक्षा, वाहतूक नियम तसेच सायबर सुरक्षा जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत खालापूर पोलीस ठाण्याच्या पथकाने वावोशी येथील पीएनपी इंग्लिश स्कूलला भेट देत विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना पोलीस शस्त्रांची माहिती, गुड टच-बॅड टचची जाणीव, बालकांवरील होणारे अत्याचार, मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यासोबतच आपत्कालीन प्रसंगी वापरायचा ११२ हा क्रमांक, सायबर गुन्ह्यांपासून स्वत:चे संरक्षण कसे करावे तसेच वाहतुकीचे नियम पाळण्याचे महत्त्व यावरही मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना पोलिसांनी समर्पक उत्तरे देत सुरक्षित व जबाबदार नागरिक बनण्याचा संदेश दिला. खालापूर पोलीस ठाण्याच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षा, कायदा व सामाजिक जबाबदारीबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण झाली असल्याचे शाळा प्रशासनाने नमूद केले. यावेळी पोलीस काका स.पो.नि. संतोष आवटी, पोलीस शिपाई पाटील, पोलीस शिपाई बनसोडे आणि विद्यार्थी उपस्थित होते.


दिनांक : ०८ जानेवारी २०२६

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं.. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.-आर.पॉ. | आकार रूपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) वामन मारुती कोळंबे<br>२) विमल मारुती कोळंबे<br>३) सरस्वती हरिश्चंद्र तरे<br>४) अंजना शंकर कोळंबे<br>५) प्रकाश शंकर कोळंबे<br>६) उमेश शंकर कोळंबे | ६० | ३/अ | ०-४९-३० | ५ | ३७ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-०८/०१/२०२६



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे सावेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतींचे मालक संतोषकुमार हौशिलाप्रसाद विश्वकर्मा यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २३/२ | ००-४८-१० हे.आर.पॉ. या एकूण क्षेत्रापैकी ००-१८-०० हे.आर.पॉ. इतके क्षेत्राची मिळकत | २-९४ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०८ जानेवारी २०२६

**ॲड. स्वप्नील सदानंद पाटील**
बी. ए. एल. एल. बी.
पत्ता - भालिवडी, पोस्ट - गौळवाडी,
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ८७७९९३३८७२



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक १. शरद जगन्नाथ क्षिरसागर २. अंजली शरद क्षिरसागर ३. आशय शरद क्षिरसागर यांचेकडून सदर मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २६ | ५ | एकुण क्षेत्र ०-८७-०० पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे क्षेत्र ०- २०-२२ हे. आर. पॉ | ०-२७ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०७/०१/२०२६

**ॲड. संदीप हरिश्चंद्र मसणे**
बी.ए.एल.एल.बी.
पत्ता - ब्लॉक नं.१०१, कोर्ट व्ह्यू बिल्डींग,
पहिला मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९६०४५४५७७७

## निवडक




### आंबेवाडीत साखळी उपोषण सुरूच

**कोलाड** : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील आंबेवाडी, कोलाड, वरसगांव येथील उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूला २०० मिटर अंतरावर अंडरपास बोगदे देण्यात यावे, सर्विस रोडचे काम पूर्ण करून देणे, गटारावरील झाकणे बसवून देणे, त्याचबरोबर पेण, नागोठणे, लोणेरे, महाड येथे जसे अंडरपास ठेवले आहेत तसेच आंबेवाडी नाक्यावर ठेवावेत, अशा विविध मागण्यांसाठी आंबेवाडी बाजारपेठेतील द.ग. तटकरे चौकात परिसरातील नागरिकांनी साखळी उपोषण सुरू केले आहे. हे उपोषण तिसऱ्या दिवशी देखील सुरूच ठेवण्यात आले असून सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत बाजारपेठेतील दुकाने बंद ठेवून व्यापाऱ्यांनी साखळी उपोषणाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी माजी सरपंच सुरेश महाबळे, चंद्रकांत लोखंडे, गणेश शिंदे, चंद्रकांत जाधव, संजय कुर्ले, महेंद्र वाचकवडे, विजय बोरकर, भाऊ गांधी, मिलिंद कदम, कांतीलाल गांधी, ज्ञानेश्वर खामकर, विष्णु महाबळे, दगडू हाटकर, भावेश जैन, मयूर जैन, तसेच व्यापारी संघटना, रिक्षा संघटना, टेम्पो संघटना व कोलाड परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### कोटनाका रेल्वे स्थानक मार्गावर प्रकाशाचा विजय

**उरण** : तालुक्यातील कोटनाका ते उरण रेल्वे स्थानक हा अत्यंत वर्दळीचा मार्ग आहे. परंतु, गेल्या अनेक वर्षांपासून हा मार्ग अंधाराच्या सावलीत सापडला होता. संध्याकाळ होताच हा रस्ता अपघात, चोरी, गैरप्रकार आणि भीतीचे माहेरघर बनले होता. त्यामुळे या रस्त्यावरून जाताना महिला, विद्यार्थी, नोकरदार आणि रेल्वे प्रवाशांना दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत होता. मात्र, याकडे संबंधित यंत्रणा आणि प्रशासनाकडून बघ्याची भूमिका घेतली जात होती. अशा परिस्थितीत उरण तालुका मराठी पत्रकार संघाने हा प्रश्न ठामपणे उचलून धरला. पत्रकार संघटनेचे अध्यक्ष घनश्याम कडू यांच्या नेतृत्वाखाली, उपाध्यक्ष विरेश मोडखरकर, दिलीप कडू आणि सरचिटणीस अजित पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा करत प्रशासनाच्या दारात ठोठावले. केवळ बातम्या प्रसिद्ध करून थांबण्याऐवजी, 'जबाबदारी घ्या, नाहीतर प्रश्न वाढवू' असा स्पष्ट इशारा त्यांच्याकडून देण्यात आला. पत्रकार संघाच्या या आक्रमक भूमिकेमुळे अखेर प्रशासनाला हालचाल करावी लागली. चाणजे सरपंच अजय म्हात्रे आणि ग्रामविकास अधिकारी चव्हाण यांनी पुढाकार घेत कोटनाका ते उरण रेल्वे स्थानक या संपूर्ण मार्गावर ५ सौरऊर्जा दिवे बसवले. त्यामुळे वर्षानुवर्षांचा अंधार दूर होऊन हा रस्ता अखेर प्रकाशमान झाला आहे.





### पत्रकारांसाठी दालनाची मागणी

**चिरनेर** : उरण तालुक्यातील पत्रकारांना वृत्त संकलन करण्यासाठी उरण नगर परिषदेच्या प्रशासकीय भवनात स्वतंत्र दालन उपलब्ध करून देण्यात यावे, या मागणीसाठी उरण तालुका दैनिक पत्रकार संघाच्यावतीने नगराध्यक्षा भावना घाणेकर यांना मंगळवारी (दि.६) पत्रकार दिनाचे औचित्य साधत, लेखी निवेदन देण्यात आले आहे. जागतिक स्तरावरील जेएनपीए अंतर्गत असलेली बंदरे तसेच विविध शासकीय निमशासकीय प्रकल्प व वाढत्या औद्योगिकीकरणामुळे उरणची ओळख आता जगाच्या नकाशावर होऊ लागली असताना, उरण नगरपरिषदही अपवाद नाही. त्यामुळे उरण नगरपरिषदेच्या होणाऱ्या सर्वसाधारण सभा, बैठका व अन्य कार्यक्रमांवर भविष्यात सर्वांचेच लक्ष वेधून राहाणार आहे. त्या अनुषंगाने नगरपरिषदेच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी विविध घडामोडी व कामकाजाचे विविध वृत्तपत्रातून, वृत्तांकन होणे देखील काळाची गरज आहे. उरण परिसरात वृत्त संकलन करण्यासाठी राज्य, जिल्हा, स्थानिक वृत्तपत्र तसेच इतर विविध माध्यमातही अनेक पत्रकार कार्यरत आहेत. त्यांना नगर परिषदेच्या प्रशासकीय भवनात दालन उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी उरण तालुका दैनिक पत्रकार संघामार्फत नगराध्यक्षा भावना घाणेकर यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

# चरईखुर्द, तळेगाव ग्रामपंचायतींना दणका

## डझनभर ग्रामपंचायत सदस्य अपात्र; जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश निर्गमित

| तळा | प्रतिनिधी |

तळा तालुक्यात दोन वर्षांपूर्वी ग्रामपंचायत निवडणूका पार पडल्या. या निवडणूकीचा खर्च उमेदवारांना ३० दिवसांच्या आत तहसिलदारांकडे सादर करणे आवश्यक होते. परंतु, मुदतीत खर्च सादर न केल्याने चरईखुर्द आणि तळेगाव येथील निवडणूक लढविलेल्या १२ उमेदवारांना ग्रामपंचायत सदस्य म्हणून राहाण्यास व पुढील पाच वर्ष निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविण्यात आले आहे. याबाबत जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी आदेश निर्गमित केला आहे.







तळा तालुक्यातील चरईखुर्द व तळेगाव या ग्रामपंचायतींसाठी ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२३ दरम्यान मतदानाची प्रक्रिया पार पडली. या निवडणूकीचा निकाल घोषित झाल्यानंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना एक महिन्याच्या आत निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे आवश्यक होते. त्यानुसार प्रतीक्षा सकपाळ, लक्ष्मण भोईर, मंगेश तांबे, हर्षदा भोईर या चरईखुर्द ग्रामपंचायतीतील उमेदवार व सुवर्णा तळेगावकर, सविता जागुष्टे, सुशील पाशिलकर, रमेश महाडिक, प्रियांका पाशिलकर, लक्ष्मी महाडिक, कुंदा शेलार, साक्षी चाळके या तळेगाव ग्रामपंचायतीच्या उमदेवारांनी आपले खर्चाचे हिशोब सादर केले नाही. त्यामुळे या उमेदवारांना अपात्र ठरविण्यासाठी लेखी अर्ज करण्यात आले होते. याबाबत जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आदेश निर्गमित केला आहे. त्यांनी निवडणूक आयोगाचे आदेश व मुंबई ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदीनुसार निवडणूक लढविलेल्या या उमेदवारांना आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीकरीता ग्रामपंचायत सदस्य, व सरपंच राहण्यास किंवा इतर निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविण्यात आले आहे. त्यामुळे पुढील पाच वर्ष हे उमेदवार निवडणूक लढवू शकणार नाहीत.

तसेच, गिरणे व निगुडशेत या ग्रामपंचायतीसाठी देखील मतदानाची प्रक्रिया पार पडली होती. या ग्रामपंचायतीत खर्चाचा तपशील न देणाऱ्या उमेदवारांना अपात्र करण्यासाठी लेखी अर्ज करण्यात आला होता. परंतु, हा अर्ज फेटाळण्यात आल्यामुळे गिरणे आणि निगुडशेत ग्रामपंचायतीतील सदस्यांवरील टांगती तलवार हटली आहे.

प्रशासनाने हा निकाल लावण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी घेतला, याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. दरम्यान, चरईखुर्द ग्रामपंचायतीमध्ये सरपंच प्रवीण अंबार्ले यांना मोठा दणका बसला असून त्यांची ग्रामपंचायत अल्पमतात आली असल्याने प्रशासन कोणती पाऊले उचलते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे.

## जेएनपीए प्राधिकरणाची भागदारांशी चर्चा



| उरण | प्रतिनिधी |

भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधीकरणाने मंगळवारी (दि.६) भागधारकांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत हरित उपक्रमांवर तसेच बंदराच्या भावी वाटचाल व शाश्वततेशी संबंधित विविध धोरणात्मक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकील कंटेनर टर्मिनल ऑपरेटर, कंटेनर शिपिंग लाईन्ससह प्रमुख भागधारक उपस्थित होते. बदलते जागतिक प्रवाह, बंदर क्षेत्रातील नव्या घडामोडी तसेच भविष्यातील गरजांसाठी कार्यात्मक सज्जतेबाबत विचारविनिमय करण्यात आला. बैठकीत सहभागी भागधारकांनी आपले दृष्टिकोन मांडत समन्वयातून शाश्वत व कार्यक्षम विकास साधण्यावर भर दिला.

संवादाच्या दरम्यान, जागतिक शिपिंग उद्योगात पर्यायी व स्वच्छ इंधनांच्या विकसित होत असलेल्या परिदृश्यावर तसेच हरित इंधनावर चालणाऱ्या जहाजांची जेएनपीए येथे वाढती आवक कशी होऊ शकते, यावर सखोल चर्चा करण्यात आली. अशा जहाजांना सेवा देण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची तयारी आणि दीर्घकालीन नियोजन याबाबत भागधारकांनी आपले दृष्टिकोन मांडले. यामध्ये एलएनजी, मेथेनॉल, ग्रीन हायड्रोजन, अमोनिया आदी विविध प्रकारच्या इंधनांचा अवलंब करण्याची व्यवहार्यता, त्यासाठी लागणारी पायाभूत रचना तसेच सुरक्षित व शाश्वत कार्यपद्धती यांवरही चर्चा करण्यात आली. या बैठकीला जेएनपीएचे उपाध्यक्ष रवीश कुमार सिंग आणि जेएनपीएचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

## मुरूडमधील घोडागाडी व्यवसाय अडचणीत?

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड तालुक्यातील समुद्रकिनारी दरवर्षी लाखो पर्यटक ये-जा करीत असतात. याच पर्यटकांच्या माध्यमातून घोडागाडी, ऊंट आणि सायकल मालकांना चांगला रोजगार उपलब्ध होतो. परंतु, समुद्रकिनाऱ्यावर सँड बाईक आल्याने त्यांचा व्यवसाय अडचणीत सापडला असल्याचे या व्यावसायिकांकडून बोलले जात आहे.



नाताळचीसुट्टीवथर्टीफर्स्टयावेळी समुद्रकिनारी हाजोरो पर्यटकांनी मुरूड समुद्रकिनारी हजेरी लावली. परंतु, पर्यटकांनी घोडागाडीकडे पाठ फिरवून सँडबाईक्स यांच्याकडे आकर्षित झाले. त्यामुळे घोडागाडी चालक-मालक निराश होऊ लागले आहेत. तसेच, याकारणावरून घोडागाडी चालक आणि सँड बाईक चालक यांच्यामध्ये तणावपूर्वक परिस्थिती निर्माण होऊ लागली आहे. घोडागाडी मालक योगेश सतविडकर यांनी कृषीवलच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, घोडागाडी व्यवसाय हा वडीलोपार्जित व्यवसाय आहे. या व्यवसायावर आमचा उदार निर्वाह चालत आहे. ऑक्टोबर ते डिसेंबर हे तीन महिने आमच्या व्यवसायासाठी महत्वाचे महिने आहेत. या महिन्यात चांगला व्यवसाय होत असतो. परंतु, सँडबाईक्स आल्यामुळे तीन वर्षांपासून आमचा घोडागाडीचा व्यवसाय कमी होत चालला असून आता पर्यटकांच्या मागे धावावे लागते. त्यामुळे दिवसातून कमीत कमी दोन फेऱ्या होणे देखील कठीण झाले आहे. त्यामुळे घोड्यांचा खर्च देखील सुटत नाही. सध्या मुरूड समुद्रकिनारी १० घोडागाडी चालक-मालक असुन आम्ही एकत्र पणे व्यवसाय करतो. सुरवातीला मोजक्या सँडबाईक याठिकाणी होत्या. तेव्हा आमचा व्यवसाय चांगला व्हावयाचा. परंतु, आता त्यांच्या संख्या वाढु लागल्यामुळे त्याचा परिणाम घोडागाडी व्यवसायावर होऊ लागला आहे. महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाच्या निरीक्षकांनी सँडबाईक्सला पायबंदी घालावी. जेणेकरुन त्यांची संख्या आटोक्यात राहिल, अशी प्रतिक्रिया सतविडकर व सहकाऱ्यांनी दिली.

### उरणमधील समुद्रकिनारे झाले चकाचक

**उरण** : रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर महाविद्यालय, महालण विभाग, फुंडे कॉलेज व कांदळवन कक्ष अलिबाग यांनी उरण येथील पिरवाडी समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम राबवली. तसेच, वीर वाजेकर कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र दल, वनविभाग कांदळवन कक्ष अलिबाग, कांदळवन प्रतिष्ठान महाराष्ट्र, फ्रेंड्स ऑफ नेचर(फॉन) चिरनेर, लायन्स क्लब उरण गोल्ड, मँग्रुऊ कंजर्वेशन मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने उरण येथील नागाव समुद्रकिनारा देखील स्वच्छ करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे जवळजवळ २६८ विद्यार्थी स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते.

## वालासह कडधान्याचे उत्पादन घटले

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यातील शेतांमध्ये ज्या ठिकाणी भात कापणी झाल्यानंतर भरपूर प्रमाणात ओलावा असतो अशा जमिनीवर वाल, चवळी, मूग, उडीद अशा कडधान्यांची पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. कोकणासह रायगड जिल्ह्यामध्ये कडव्या वालाच्या गावठी शेंगा झाल्यानंतर पोपटी लावण्याची परंपरा अजून सुरू असते. त्यामुळे कडव्या वालाचे पीक हे खूप मोठ्या प्रमाणात घेतले जाते.



श्रीवर्धन तालुक्यात कडव्या वालाचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. परंतु, मागील काही वर्षांपासून मोकाट घोडे व गुरे यांच्या त्रासामुळे येथील शेतकऱ्यांनी पीक घेणे बंद केले आहे. शेताला कितीही चांगली कुंपण घातली तरी मोकाट गुरे वालाच्या शेतामध्ये शिरून पीक फस्त करून टाकतात. त्यामुळे गावठी वालाच्या पिकात मोठी घट होत चालली आहे. त्यामुळे खवय्यांना पोपटीसाठी बाजारात मिळणाऱ्या पांढऱ्या वालाच्या शेंगांवर भागवावे लागत आहे. श्रीवर्धन तालुक्यात पर्यटन व्यवसाय वाढल्यानंतर या ठिकाणी समुद्रकिनाऱ्यावर अनेक घोडागाडीवाले व घोडे सवारी यांनी मोठ्या प्रमाणात घोडे आणले आहेत. दिवसभर धंदा केल्यानंतर या घोड्यांना घरी न बांधता मोकाट सोडले जाते. त्यामुळे तालुक्यातील अनेक भागांमध्ये हे घोडे पिकाचे नुकसान करतात. त्याचप्रमाणे दुर्गंधी देखील पसरवतात. शेतकऱ्याने शेताच्या सभोवताली कितीही चांगली कुंपण घातली तरी घोडे त्यावरून उडी मारून आतमध्ये शिरतात. त्याचप्रमाणे मोकाट गुरे देखील कुंपणावरून उडी मारून शेतात शिरतात व पीक फस्त करतात. एकूणच या सर्व प्रकारामुळे कडधान्याच्या पीक उत्पादनावर याचा परिणाम झाल्याचे पाहायला मिळत आहे.

### शिक्षकांचा सत्कार

**पेण** : अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघ पेणच्यावतीने बुधवारी (दि.७) पेण येथील आगरी विकास मंच येथे शिक्षक वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी तालुक्यातील गुणवंत शिक्षक व आदर्श शाळांना पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. या कार्यक्रमासाठी पेण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गजानन लेंडी, गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे, विस्तार अधिकारी अरुणादेवी मोरे, प्रभाकर म्हात्रे, डी.बी. पाटील, अमरचंद पाटील, आदिनाथ पाटील, मोहन भोईर, किशोर पाटील, नंदकुमार थवई, सरिता पाटील, राजेंद्र पाटील, अरविंद वाघमारे आदी उपस्थित होते.

## कारिवणे ग्रामपंचायतीचे आदर्श पाऊल

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत बुधवारी (दि.७) जिल्ह्यात 'वनराई बंधारा बांधणे' मोहिम राबविण्यात आली. दरम्यान, या मोहिमेला कारिवणे ग्रामपंचायतीने अभूतपूर्व प्रतिसाद देत जलसंधारणाच्या दिशेने एक आदर्श पाऊल टाकले आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या धोरणाने प्रेरित होऊन कारिवणे ग्रामस्थांनी जलसमृद्धीचा हा वसा घेतला आहे.



या मोहिमेत माजी सभापती बाबुराव चोरगे, सरपंच गीता चोरगे, उपसरपंच बबन जोशी, कृषी अधिकारी सयाजी इंगळे, ग्रामपंचायत अधिकारी अभिजित माने, कृषी सहाय्यक दत्तात्रय कुंभारकर, प्राजक्ता जाबरे, गणेश भुवड, बाळकृष्ण मस्कर, तुकाराम मस्कर, लक्ष्मण भुवड, अनंता चोरगे, अक्षय चोरगे यांच्यासह ग्रामस्थ, युवक मंडळ आणि महिला बचत गटांनी सक्रिय सहभाग घेतला होता. ग्रामस्थांच्या या श्रमदानातून साकारलेले हे वनराई बंधारे केवळ तात्पुरते पाण्याचे स्रोत नसून, ते गावाला दुष्काळमुक्त करून कृषीला समृद्ध करणारे आणि भूजल पातळी वाढवणारे संजीवनी ठरतील, असा विश्वास ग्रामपंचायत प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## माणगावातील ट्रॉमा केअर रुग्णालयाला निधी मंजुर

### • प्रशासकीय मान्यते अभावी प्रतीक्षा

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव शहरासाठी आणि संपूर्ण दक्षिण रायगड व कोकण पट्ट्यासाठी अत्यंत दिलासादायक ठरणारी बातमी समोर आली आहे. माणगाव उपजिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक ट्रॉमा केअर सेंटर उभारण्यासाठी सुमारे १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, या केंद्रामुळे गंभीर अपघातग्रस्तांना वेळेत उपचार मिळून अनेकांचे प्राण वाचणार आहेत. मात्र, अद्याप या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळायची बाकी असल्याने प्रत्यक्ष काम सुरू होण्यासाठी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे, अशी माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे वरीष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश मेहता यांनी दिली.

गेल्या अनेक वर्षांपासून माणगाव येथे ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्याची जोरदार मागणी नागरिक, सामाजिक संस्था आणि लोकप्रतिनिधींकडून केली जात होती. विशेषतः मुंबई-गोवा महामार्गावर वारंवार होणाऱ्या भीषण अपघातांमध्ये वेळेत आणि आधुनिक उपचार न मिळाल्याने अनेक अपघातग्रस्तांना आपला जीव गमवावा लागत होता. गंभीर जखमी रुग्णांना मुंबई, पनवेल, पुणे किंवा अलिबाग येथे हलवताना अनेकदा मोलाचा वेळ वाया जात होता. ही गंभीर बाब लक्षात घेऊन शासनाने अखेर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला गती दिली आहे.आता या ट्रॉमा केअर सेंटरच्या इमारत बांधकामासाठी १४ कोटी ५१ लाख रुपयांची तांत्रिक मान्यता मिळालेली असून, लवकरच प्रशासकीय मान्यताही देण्यात येईल, असा विश्वास खा. तटकरे यांनी व्यक्त केला आहे. प्रशासकीय मान्यता मिळताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याचे त्यांनी सांगितले.



### मॅकमोहन यांच्यासह सहकार्यांची मोहिम | गुळाच्या ढेपा सुळक्यावर यशस्वी गिर्यारोहण

## सुधागडातील गिर्यारोहकांची उल्लेखनीय कामगिरी

| सुधागड | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील गिर्यारोहक मॅकमोहन यांच्यासह अमित तोरसकर आणि निलेश कवडे यांनी सह्याद्रीतील दुर्गम मानल्या जाणाऱ्या गूळाच्या ढेपा सुळक्यावर नुकतीच यशस्वी गिर्यारोहण करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

सुधागड किल्ल्याला जोडलेल्या डोंगरसोंडेवर तैलबैला परिसरातून खाली आलेल्या धारेवर वसलेले गूळाच्या ढेपा हे चार सुळके गिर्यारोहणासाठी प्रसिद्ध आहेत. यापैकी गूळाची ढेप २ हा सुळका सुमारे ११० फूट उंच असून सोप्या श्रेणीतील मार्गाने हा सुळका सर करण्यात आला. या मोहिमेत सुरक्षिततेचे सर्व नियम पाळत तांत्रिक कौशल्य व योग्य नियोजनाच्या जोरावर शिखर गाठण्यात आले. या यशस्वी मोहिमेमुळे सुधागड तालुक्यातील गिर्यारोहकांचा नावलौकिक वाढला असून परिसरातील युवकांसाठी ही कामगिरी प्रेरणादायी ठरली आहे.



गुळाची ढेप २ व ३ यांमधील खिंडीतून आरोहण मार्गाची सुरुवात होते. सोपे आरोहण करून माथ्यावर पोहोचता येते. मार्गातील प्रस्तराला टेप लावून दोर ओवता येतो. दोर लावण्यासाठी माथ्यावर झाड आहे.

या सुळके समूहापर्यंत वेगवेगळ्या मार्गांनी जाता येते. त्यात तैलबैला सुळके सर केल्यानंतर गुळाच्या ढेपा सुळक्यांकरिता कोकणात उतरता येते. मुंबई किंवा पुण्यावरून पाली-वैतागवाडी मार्गे धोंडसे गावातून जाता येते. तसेच, सुधागडाच्या पायथ्याला वसलेल्या ठाकूरवाडी गावात उतरून गूळाच्या डेपांपर्यंत पोहोचता येते.

### तैलबैला मार्गे ढेपावरून तळ कोकण

तैलबैला सुळका सर केल्यानंतर गुळाच्या ढेपा सुळक्यांकरिता कोकणात उतरता येते. तैलबैला पठारावरून सुधागडाकडील कड्यापर्यंत गेले की खाली साध्यकडा व सुधागडाला जोडणाऱ्या धारेवर असलेले चार सुळके दिसतात. या धारेवर उतरणारी वाट कड्यातील ओढ्यातून खाली जाते. धारेवरून गुळाची ढेप-१ या सुळक्याच्या पायथ्यापर्यंत पोहोचता येते. गुळाची ढेप-२ व ३ हे मुळके सर करण्यासाठी उजवीकडील ओढ्यातून खाली उतरायचे. हाच ओढा पुढे धोंडसे गावाकडे जातो. सुळका २ व ३ कडून खाली आलेल्या घळीपर्यंत खाली आल्यानंतर त्या घळीतून वर चढत जात गुळाची ढेप-२ व ३ यांमधे पोहोचायचे. तिथून दोन्ही सुळके सर करता येतात. सुळक्यापर्यंत जाण्यासाठी पुन्हा खाली यायचे व सुळका ३ व ४ यांमधून खाली आलेल्या ओढ्यातून वर जायचे. तैलबैला सर करून सवाष्णी घाटमार्गे धोंडसे गावात उतरायचे. त्यानंतर किल्ल्यावर जाणाऱ्या वाटेने वर येत सुळक्याखाली असलेल्या ओढ्यात पोहोचायचे आणि सुळक्यांचे पायथे गाठायचे.

### ठाकूरवाडी मार्गे ढेपा

ठाकूरवाडी हे सुधागडाच्या पायथ्याला वसलेले गाव आहे. या गावासाठी पालीहून बस सेवा उपलब्ध आहे. ठाकूरवाडीत उतरून गूळाच्या ढेपांपर्यंत पोहोचता येते. ठाकूरवाडीत उत्तरल्यानंतर सुधागडाला आपल्या डावीकडे ठेवत नदीच्या काठाकाठाने जाणाऱ्या वाटेने धनगडाच्या दिशेने चालत राहायचे. सुधागडाच्या दुसऱ्या टोकाला आल्यानंतर गूळाच्या ढेपांची वरची टोके दिसू लागतात. या सुळक्यांच्या खाली समांतर आल्यानंतर जंगलातून वाट काढत सुळक्यांच्या पायथ्यापर्यंत जाता येते.

## शत्रू वाढवण्याचे धंदे

गेल्या वर्षी दुबईमध्ये आशिया चषक क्रिकेट स्पर्धेतील विजयानंतर भारतीय संघाने पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन करण्यास नकार दिला होता. नंतर हा चषक पाकिस्तानी मंत्र्यांच्या हातून घेण्याचेही नाकारले होते. पहलगाम हल्ल्याला पाकिस्तानचा पाठिंबा असल्याचे कारण देऊन हे करण्यात आले होते. हा मूर्खपणा असून उद्या बांगलादेश वा श्रीलंका यांनी भारताबाबत हाच पवित्रा घेतला तर आपण काय करणार आहोत असा प्रश्न याच स्तंभामध्ये कृषीवलमधून आम्ही उपस्थित केला होता. बरोबर वर्षभरानंतर तो प्रश्न आता वास्तवात उतरला आहे. बांगलादेशाने पुढील महिन्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषकाचे सामने भारतात खेळायला नकार दिला आहे. म्हणजे आता बांगलादेशसोबतचे सामने खेळण्यासाठी भारताला श्रीलंकेत जावे लागेल. बांगलादेशाने आयपीएलचे सामने आपल्या देशातील टीव्ही दाखवण्यासही बंदी घातली आहे. अर्थात याला पुन्हा भारताचा टर्रेबाजपणाच कारणीभूत ठरला. बांगलादेशाचा जलदगती गोलंदाज मुस्तफिझूर रहमान याला कोलकाता नाईट रायडर्समधून काढून टाका असे फर्मान बीसीसीआयने दोन दिवसांपूर्वी दिले. यासाठी कोणतेही कारण देण्यात आले नाही. पण बांगलादेशातील हिंदूंवर सध्या जे हल्ले होत आहेत त्यामुळेच चिडून जाऊन हे फर्मान निघाले हे उघड आहे. भाजप आणि मोदींच्या भक्तांना हा आदेश योग्यच वाटेल. पण खेळ आणि राजकारण यात फरक न करणारे हे नादान भक्त आहेत. बांगलादेशामध्ये शेख हसीनांचे सरकार उलथल्यापासून धर्मांध मुस्लिमांचा प्रभाव वाढतो आहे हे खरे आहे. सरकारचे हंगामी प्रमुख महमंद युनूस यांनीही याबाबत बोटचेपी भूमिका घेतली आहे.त्यामुळे हिंदू व्यक्ती व त्यांची दुकाने, कार्यालये, कारखाने इत्यादींवर हल्ले वाढत आहेत. काही जणांचे यात बळीही गेले आहेत. याचा निषेध करावा तितका थोडाच आहे. नरेंद्र मोदी सरकारने राजनैतिक पातळीवर तो करायला हवा. बांगलादेश अनेक बाबतीत भारतीय व्यापारावर अवलंबून आहे. त्याचा उपयोग करून तेथील सरकार व जनता यांच्यावर दबाव आणायला हवा. मात्र हे काम बीसीसीआयकडून करून घेणे हे अत्यंत आक्षेपार्ह आहे. हे निव्वळ शत्रू वाढवण्याचे धंदे आहेत.

### हिंदूंवरचे हल्ले ही गुंडगिरी

बांगलादेशातील धर्मांध राजकारणाची तिथल्या क्रिकेट किंवा कोणत्याही खेळातील खेळाडूंना देणे हा घातक पायंडा आहे. खेळ हे मनोरंजनासाठी खेळले जातात. तसेच दोन देशांमधील संबंध अधिक चांगले करण्यासाठीही वापरले जातात. प्रत्येक देशातील जनतेला आपापले संघ प्यारे असले तरी ते इतर संघांमधील चांगल्या खेळाडूंनाही नेहमीच दाद देतात. एरवी आपला शत्रू असलेल्या पाकिस्तानच्या इम्रान खानचे फॅन असलेले अनेक भारतीय होते. पाकिस्तानात सुनील गावस्कर, सचिन तेंडुलकर हे चांगलेच लोकप्रिय होते. इम्रान खान पंतप्रधान झाला तेव्हा आपल्या शपथविधीला गावस्करला खास निमंत्रित केले होते.(त्यावेळी मोदींच्या भारतात त्याची वेगळी प्रतिक्रिया येईल म्हणून त्यांनी बहुदा जाण्याचे टाळले होते ही गोष्ट वेगळी).दहशतवादी गटांना पाठिंबा देण्याचे काम पाकिस्तान नेहमीच करत आलेला आहे. त्यासाठी भारताने वेळोवेळी संयुक्त राष्ट्रसंघापासून सर्व स्तरांवर पाकिस्तानला कोंडीत पकडण्याचे उपाय केले आहेत. पहलगामनंतर तर ऑपरेशन सिंदूर आखण्यात येऊन दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ले करण्यात आले. त्याला अगदी विरोधी काँग्रेस पक्षासकट सर्वांनी पाठिंबा दिला होता. मात्र हे राजकारण खेळांमध्ये आणून खेळाडूंना त्यांच्या सरकारांच्या वा त्या देशांमधील धर्मांध अतिरेक्यांच्या कृत्यांबद्दल जबाबदार धरणे हे गैर आहे. शिवाय बांगलादेशाची स्थिती पाकिस्तानहून वेगळी व बरी आहे. पाकिस्तानमध्ये सरकार व लष्कराचा हेतू संशयास्पद असतो. दहशतवादी गटांना त्यांचीही फूस असल्याचा संशय असतो. बांगलादेशाबाबत सध्या तरी तशी स्थिती नाही. तेथील हिंदूंवर हल्ले करण्याचे प्रकार करणारे हे गुंड आहेत. त्यांना सरकारचा पाठिंबा आहे असे वाटत नाही. उद्या जमाते इस्लामीचे सरकार आले तर तिथे पाकिस्तानसारखी स्थिती होईल हे खरे आहे. पण जमाते इस्लामीला इतका पाठिंबा तिथे आहे असे वाटत नाही. उलट जमाते इस्लामी पक्षाशी सहयोग केल्यामुळे तेथील बहुसंख्य तरुण विद्यार्थ्यांनी एनसीपी या पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. हिंदूंवर हल्ले करणाऱ्यांवर टीका करणारे अनेक गट व अवामी लीगसारखे पक्ष तेथे अस्तित्वात आहेत. त्यामुळे तो देश सर्वस्वी धर्मांधांच्या हातात गेला असून यच्चयावत जनता हिंदूविरोधी झाली आहे असे घडलेले नाही.

### उद्या भारतावर बहिष्कार पडेल

अशा स्थितीत भारताने मुस्तफिझूरसारख्यांवर बंदी घालणे हे तिथल्या धर्मांधांना अधिक मदत करणारे आहे. यामुळे आजवर तटस्थ असलेले सामान्य लोकही दुखावले जाण्याची व भारतविरोधी होण्याची शक्यता आहे. तेथील हिंदूंवर हल्ले करणाऱ्यांना यामुळे अधिक बळ मिळण्याचाही संभव आहे. फाळणीनंतरही बांगलादेशात राहिलेल्या आणि तेथील धंदेव्यापारात किंवा सरकारी नोकऱ्यांमध्ये प्रगती केलेल्या हिंदूंचे प्रमाण तेथे मोठे आहे. आजवर बांगलादेशाचे नागरिक म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जात होते. पण आता मोदींच्या भक्तांनी भारत हा एक हिंदुराष्ट्र असल्याचे घोषित केले आहे. शिवाय मोदींनी बांगलादेशासह शेजारील देशांमधून भारतात येणाऱ्या हिंदूंना नागरिक करून घेण्याचा कायदा संमत केला आहे. अशा स्थितीत आजवर आनंदाने तिथे राहणाऱ्या हिंदूंकडे सरसकट हे भारतीय एजंट किंवा देशद्रोही म्हणून पाहिले गेले तर आश्चर्य वाटू नये. तेथील धर्मांध हाच प्रचार करणार असून आपल्या हिंदूंवरील हल्ल्यांचे समर्थन करणार आहेत. आता मुस्तफिझूरला काढून टाकल्याने त्यांना भारत व हिंदूंचा द्वेष करण्यासाठी आयतेच कारण मिळणार आहे. त्यामुळे बीसीसीआयचा निर्णय खेळ वा राजकारण यापैकी कोणत्याच दृष्टीने योग्य वा समर्थनीय नाही. भारत हा हिंदूराष्ट्र असल्याचे मोहन भागवत यांनी परवा पश्चिम बंगालमध्ये जाऊन सांगितले होते. हा धागा धरून भारत हा मुस्लिम व ख्रिश्चनविरोधी असल्याचा प्रचार होऊ शकतो. भाजप परिवाराशी संबंधित गट त्यासाठी आणखी निमित्ते पुरवत असतातच. गोहत्येच्या संशयावरून मुस्लिमांवर होणारे हल्ले किंवा मुस्लिमांवर बहिष्कार घालण्याची भाषा नित्याची झाली आहे. ही उदाहरणे देऊन जगभरातील मुस्लिम देशांनी भारतीय खेळाडूंशी खेळणार नाही अशी भूमिका घेतली तर आपली काय पंचाईत होईल याचा विचार करण्यासारखा आहे. अलिकडेच नाताळच्या कार्यक्रमांना विरोध व हल्ले झाले. याचा दाखला देऊन उद्या अमेरिका व युरोपीय देशांनी आपल्याला खेळांमधून कटाप केले किंवा आपल्याशी संबंध तोडले तर काय होईल याचाही विचार करायला हवा. क्रिकेटमध्ये राजकारण आणण्याचे असे दूरगामी परिणाम होऊ शकतात याचे भान बाळगायला हवे. एकीकडे आपण भविष्यात ऑलिंपिक भरवण्याची स्वप्ने पाहतो आणि दुसरीकडे ऑलिंपिक भरवण्यामागच्या भावनेवरच घाला घालतो हा प्रचंड विरोधाभास आहे. आज भारतीय क्रिकेट बोर्ड जगात सर्वात श्रीमंत आहे. क्रिकेटचे सर्वाधिक प्रेक्षक भारतात असल्याचा आपल्याला फायदा आहे. पण त्या सत्तेचा वापर करून आपण आपल्याच शेजारी देशांवर अन्याय्य दादागिरी करणे योग्य

विचार

# गृहविक्रीमध्ये घट, बांगलादेशचे सावट

***सरत्या आठवड्यामध्ये अर्थनगरीत नेहमीच्याच क्षेत्रांमधील घडामोडींचा बोलबाला होता. त्यातल्या त्यात निवासी मालमत्तांच्या विक्रीत घट अनुभवायला मिळाली. दरम्यान, बांगलादेशमधील संकटाने अर्थविश्वात काही पडसाद उमटले. याच सुमारास तीन वर्षांच्या अस्थिरतेनंतर मर्यादित पुरवठा आणि नफ्यामुळे भारतातील दुग्ध क्षेत्र पुनर्संचयनाच्या टप्प्यात प्रवेश करत असल्याचे पहायला मिळाले.***



**महेश देशपांडे**

सरत्या आठवड्यामध्ये अर्थनगरीत नेहमीच्याच क्षेत्रांमधील घडामोडींचा बोलबाला होता. त्यातल्या त्यात निवासी मालमत्तांच्या विक्रीत घट अनुभवायला मिळाली. दरम्यान, बांगलादेशमधील संकटाने अर्थविश्वात काही पडसाद उमटले. याच सुमारास तीन वर्षांच्या अस्थिरतेनंतर मर्यादित पुरवठा आणि नफ्यामुळे भारतातील दुग्ध क्षेत्र पुनर्संचयनाच्या टप्प्यात प्रवेश करत असल्याचे पहायला मिळाले.

घरांच्या वाढत्या किमती आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अस्थिरतेमुळे २०२५ मध्ये देशातील सात प्रमुख शहरांमध्ये निवासी मालमत्तेच्या विक्रीत १४ टक्क्यांची लक्षणीय घट झाली आहे. रिअल इस्टेट कन्सल्टन्सी फर्म असणाऱ्या 'ॲनारॉक'ने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, घरांच्या विक्रीत घट झाली असली तरी उच्च किमतींमुळे एकूण विक्री मूल्यात वाढ झाली असून ते सहा लाख कोटींपेक्षा जास्त नोंदवले गेले आहे. सदर अहवालानुसार, २०२५ मध्ये मुंबई महानगर प्रदेश, दिल्ली-एनसीआर, बेंगळुरू, पुणे, कोलकाता, हैदराबाद आणि चेन्नईमध्ये एकूण तीन लाख ९५ हजार ६२५ घरे विकली गेली. २०२४ मध्ये ही संख्या चार लाख ५९ हजार ६४५ होती. 'ॲनारॉक'च्या मते भू-राजकीय तणाव आणि जागतिक आर्थिक अनिश्चितता या बाबीदेखील सरत्या वर्षात निवासी मागणीवर परिणाम करत राहिल्या. परिणामी सात प्रमुख शहरांपैकी सहा शहरांमध्ये घरांच्या विक्रीत घट झाली तर चेन्नई या एकमेव शहरात निवासी घरांच्या विक्रीत वाढ नोंदवली गेली. मुंबई महानगर प्रदेशातील निवासी घरांच्या विक्रीच्या शहरनिहाय विश्लेषणानुसार खरेदीमध्ये १८ टक्क्यांनी घट होऊन ती एक लाख २७ हजारर ८७५ युनिट्सवर आली आहे. पुण्यातील विक्री २० टक्क्यांनी घटून ६५ हजार १३५ युनिट्सवर आली असून बेंगळुरूमधील विक्री पाच टक्क्यांनी घटून ६२ हजार २०५ युनिट्सवर आली आहे. अलिकडच्या काळात वेगाने वाढणारी बाजारपेठ असणाऱ्या दिल्ली-एनसीआरमध्ये घरांची विक्री आठ टक्क्यांनी घटून ५७ हजार २२० युनिट्सवर आली आहे.

नोकरकपातीचा परिणाम म्हणून हैदराबादमध्ये निवासी घरांच्या विक्रीत २३ टक्क्यांची सर्वात मोठी घसरण झाली आणि विक्री ४४ हजार ८८५ युनिट्सवर आली. कोलकातामध्येही १२ टक्क्यांनी घट होऊन आकडा १६ हजार १२५ युनिट्सवर आला. याउलट, चेन्नईतील निवासी बाजारपेठेने चांगली कामगिरी केली. तेथे विक्री १५ टक्क्यांनी वाढून २२ हजार १८० युनिट्सवर पोहोचली. 'ॲनारॉक'च्या अहवालानुसार २०२५ मध्ये सात प्रमुख शहरांमधील निवासी घरांच्या सरासरी किमती आठ टक्क्यांनी वाढून प्रति चौरस फूट ९,२६० रुपये झाल्या. गेल्या वर्षीच्या अखेरीस त्या ८,५९० रुपये प्रति चौरस फूट होत्या. याबाबत बोलताना 'ॲनारॉक'चे अध्यक्ष अनुज पुरी म्हणाले की, २०२५ हे भू-राजकीय उलथापालथ, आयटी क्षेत्रातील अस्थिरता आणि जागतिक आर्थिक अनिश्चिततेचे वर्ष होते. परंतु असे असूनही, निवासी किमती वाढीचा वेग मागील वर्षांच्या दुहेरी अंकी पातळीपेक्षा एक अंकी झाला आहे. येत्या वर्षात निवासी रिअल इस्टेट क्षेत्राची कामगिरी मुख्यत्वे भारतीय रिझर्व्ह बँक व्याजदर किती प्रमाणात कमी करते आणि किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी विकासक कोणती पावले उचलतात यावर अवलंबून असेल.

बांगलादेश सध्या सर्वात कठीण आर्थिक काळातून जात आहे. अगदी अलिकडेपर्यंत आशियातील उदयोन्मुख अर्थव्यवस्थांपैकी एक मानला जाणारा हा देश आता तीव्र अनिश्चितता आणि दबावाचा सामना करत आहे. राजकीय अस्थिरता, वाढती बेरोजगारी आणि कमकुवत होणारी अर्थव्यवस्था यामुळे सामान्य लोकांचे जगणे कठीण झाले आहे. खरे पाहता मध्यंतरीच्या राजकीय संक्रमणानंतर अंतरिम सरकारकडून स्थिरता आणि सुधारणा अपेक्षित होत्या. तथापि, परिस्थिती आणखी बिकट झाली. सततचे निषेध, हिंसाचार आणि अनिश्चित निर्णयांमुळे आता अर्थव्यवस्था बिघडली आहे. गुंतवणूकदारांच्या विश्वासाला तडा गेला असून अनेक औद्योगिक कंपन्यांनी देश सोडण्याचा निर्णय घेतला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ) नुसार, बांगला देशाचा आर्थिक विकासदर झपाट्याने कमी होत आहे. पूर्वी तो सात टक्क्यांच्या आसपास होता; पण आता तो चार टक्क्यांपेक्षा कमी झाला आहे. उत्पादनात विलंब, अत्यंत कडक धोरणे आणि राजकीय अनिश्चितता ही यामागील प्रमुख कारणे मानली जातात. महागाईने सामान्य माणसाचे कंबरडे मोडले आहे. जीवनावश्यक अन्नपदार्थ कमालीचे महाग झाले आहेत. याचा थेट परिणाम सामान्य कुटुंबांच्या खरेदी क्षमतेवर होत आहे. खर्च वाढतो आणि उत्पन्न कमी होते तेव्हा देशांतर्गत मागणी कमकुवत होणे निश्चित असते. तेच या देशात बघायला मिळत आहे.

सरकारी आकडेवारीनुसार, देशात बेरोजगारीचा दर लक्षणीयरीत्या वाढला आहे. नोकऱ्या कमी होत आहेत. त्यामुळे विशेषतः तरुण आणि कामगार वर्गात चिंता निर्माण होत आहे. लहान व्यवसाय कामकाज बंद करत असले तरी दुसरीकडे रोजगाराच्या संधी मर्यादित आहेत. त्यामुळे पेच वाढत आहे. बँकिंग व्यवस्थेचा कमकुवत होत चाललेला पाया हीदेखील चिंतेची बाब म्हणावी लागेल. सध्या मोठ्या प्रमाणात कर्जे थकीत आहेत. त्यामुळे परिस्थिती सावरणे कठीण होत आहे. या समस्या दीर्घकाळ लपवून ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे परिस्थिती आणखी बिकट होत आहे. आता बँका नवीन कर्जे देण्याबाबत सावध भूमिका घेत असल्यामुळे व्यवसायावर विपरित परिणाम होत आहे. विकासाचा कणा मानल्या जाणाऱ्या देशातील खासगी क्षेत्रातील गुंतवणूक मोठ्या प्रमाणात मंदावली आहे. कारखाने आणि व्यवसाय विस्ताराशी संबंधित यंत्रसामग्रीची आयात कमी झाली आहे. त्यामुळे कंपन्या भविष्याबद्दल आत्मविश्वासू नसल्याचे दिसून येते.अर्थात राजकीय संकट असूनही काही परदेशी गुंतवणूक वाढली आहे. दुसरीकडे अनेक मोठे गुंतवणूकदार अजूनही वाट पाहण्याच्या भूमिकेत आहेत. विशेषतः ऊर्जा क्षेत्रातील अनिश्चितेचा गुंतवणुकीवर परिणाम झाला आहे. २०२६ च्या सुरुवातीला होणाऱ्या निवडणुकांमुळे परिस्थिती सुधारू शकल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. बांगला देशची तरुण लोकसंख्या त्यांची सर्वात मोठी ताकद आहे आणि योग्य धोरणांमुळे ती अर्थव्यवस्थेला पुनरुज्जीवित करू शकते. तेव्हा आता गरज आहे ती ठोस सुधारणा आणि स्थिर राजकीय वातावरणाची.

दरम्यान, तीन वर्षांच्या अस्थिरतेनंतर मर्यादित पुरवठा आणि नफ्यामुळे भारतातील दुग्ध क्षेत्र आता पुनर्संचयनाच्या टप्प्यात प्रवेश करत आहे. 'सिस्टीमॅटिक्स इन्स्टिट्यूशनल इक्विटीज'ने आयोजित केलेल्या सत्रात तज्ज्ञांकडून हे मूल्यांकन करण्यात आले आहे. अहवालानुसार, २०२२-२३ मध्ये कोव्हिडनंतरचा काळ दुग्ध उद्योगासाठी आव्हानात्मक होता. या काळात दुधाच्या किमती इतक्या घसरल्या, की शेतकरी उत्पादन खर्चही भागवू शकले नाहीत. परिणामी, जनावरांच्या संख्येतील वाढ थांबली आणि दुधाचे उत्पादन झपाट्याने कमी झाले. तथापि, २०२३ च्या मध्यापासून परिस्थिती बदलू लागली. प्रमुख सहकारी संस्था आणि खासगी कंपन्यांनी शेतकऱ्यांशी पुन्हा संपर्क साधला, शाश्वत खाद्य कार्यक्रम सुरू केले आणि विश्वास पुनर्संचयित केला. परिणामी ऑक्टोबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत दुधाचे उत्पादन सुमारे २५ टक्क्यांनी वाढले.

या अतिरिक्त दुग्ध कंपन्यांनी मूल्यवर्धित उत्पादनांवर भर दिला. शीतसाखळी मजबूत केली. २०२५ मध्ये अवकाळी आणि अवकाळी पावसामुळे सामान्य उन्हाळ्यातील मागणी-पुरवठा चक्रात व्यत्यय आला. शिवाय, भू-राजकीय घटना, विशेषतः भारत-पाकिस्तान तणाव; पंजाब, हरियाणा आणि जम्मू आणि काश्मीर सारख्या प्रमुख दूध उत्पादक प्रदेशांवर विपरित परिणाम झाला. दरम्यान, सणांच्या मागणीतही मोठ्या प्रमाणात घट झाली.

अहवालानुसार, २०२५ च्या उत्तरार्धात विविध प्रदेशांमध्ये दूध खरेदी खर्च वाढला तर अलिकडच्या जीएसटी कपातीनंतर उत्पादनांच्या किमती स्थिर राहिल्या. बिहार आणि आंध्र प्रदेशसारख्या काही राज्यांमध्ये दुधाच्या किमती प्रति लिटर १ ते १.५ रुपयाने वाढल्या आहेत. रमजान दरम्यान एप्रिल २०२६ च्या आसपास खरेदी खर्च किंचित कमी होण्याची अपेक्षा आहे. जीएसटी कपातीनंतर कमी किमती आणि लहान पॅकमध्ये वाढलेल्या

ग्रॅमेजमुळे मागणीला पाठिंबा मिळाला आहे. परंतु पुरवठा साखळी खर्च आणि चॅनेल व्यत्यय यामुळे नफा वाढण्यासाठी कंपन्या या पर्यायांवर विचार करत आहेत. दही, चीज, तूप आणि आईस्क्रीम सारख्या मूल्यवर्धित उत्पादनांमध्ये होणारा तीव्र बदलही लक्षात घेण्याजोगा आहे. आईस्क्रीमची मागणी आता उन्हाळ्याच्या उच्चांकापुरती मर्यादित नाही तर ती वर्षभर कायम असते. वितरणपद्धती देखील वेगाने बदलत आहेत. त्यामुळे अनेक दुधउत्पादक या पर्यायाचा गांभीर्याने विचार करत आहेत.

# 'विकास' नावाच्या राक्षसाला रोखणे गरजेचे

**संतोष राऊळ**

सध्या राज्यात ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात विकास कामे होत आहेत. कुठे रस्ता, इमारती, पुलासह विविध कामे नव्याने होत आहेत. या प्रकारचा विकास देशासाठी महत्वाचा आहे. परंतु, विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात झाडे तोडली जात आहेत. उरली सुरलेली शेती उद्ध्वस्त होत आहे. पाणी प्रदुषीत होत चाललं आहे. हवेच्या प्रदुषणामुळे तर गंभीर आजार उद्‌भवत आहेत. तसेच, या सर्वांचा परिणाम पर्यटनासह स्थानिक नागरिकांच्या जीवनावर होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून वर्तविली जात आहे. त्यामुळे 'विकास' नावाच्या राक्षसाला वेळीच रोखणे गरजेचे असल्याचे सर्वसामान्यांतून बोलले जात आहे.

रायगड जिल्हा हा पर्यटनासाठीचे महत्वाचे ठिकाण आहे. या ठिकाणी असलेले डोंगर, समुद्र, झाडी यांसह येथील जेवण पद्धती याकडे पर्यटक आकर्षक होत असतात. तसेच, रायगड जिल्हा भातशेतीसह पांढरा कांदा, वाल आणि इतर महत्वाच्या पिकांसाठी देखील ओळखला जातो. पावसाळ्यात रायगड जिल्ह्याचे हिरवेगार रूप पाहण्यासाठी तर राज्यभरातील लोक भर पावसात या ठिकाणी हजेरी लावत असतात. येथील स्वच्छ व शांत समुद्रकिनारे, नारळी-पोफळीच्या बागा, उंचच उंच डोंगर, खळखळाऱ्या नद्या पर्यटकांना खास आकर्षित करत असतात. मात्र, काही वर्षांपासून विकास नावच्या राक्षसाची या हिरव्यागार जिल्ह्याला नजर लागल्याची चर्चा जोर धरत आहे. तरीदेखील पर्यटकांचे येणं थांबलेलं नाही. आता ते पूर्वी पेक्षा जास्त संख्येन येत आहेत. परंतु, या ठिकाणी आल्यानंतर त्यांना विकास नावाचा राक्षस पावलो पावली निदर्शनास येत आहे.

खरंतर देशाचा विकास होणे गरजेचे आहे. विकास नाही झाला तर देशवासियांना अधोगतीचा सामना करावा लागेल हे नक्की. परंतु, धन दांडग्यांच्या फायद्यासाठी जर हे विकास होत असतील तर तो विकास काय कामाचा, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. देशाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे त्यांच्या राहण्याची व रोजगाराची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. अशाप्रकारच्या समस्या जिल्ह्याला देखील भेडासवत आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे उरण तालुका. उरण तालुक्यात मोठ्या प्रमाणात वनसंपदा आहे. परंतु, त्या वनसंपदेला विकास नावाचा राक्षस गिळंकृत करत आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कंपन्या आहेत. तसेच, जेएनपीए सारख्या महत्वाच्या प्रकल्पामुळे उरण तालुक्याला नाव मोठे नाव मिळाले आहे. परंतु, त्यामुळे तालुक्यात विकास नावाचा राक्षस जबडा पसरून बसला आहे. येथील डोंगर तर दिवसेंदिवस फोडले जात आहेत. उरण तालुक्यातील जेएनपीए मार्गावरून ये-जा करताना दिसणाऱ्या डोंगरांची परिस्थिती पाहून किव वाटते. याकडे निसर्गप्रेमी, स्थानिक आणि पर्यावरण मंत्री कसेकाय दुर्लक्ष करू शकतात, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे.

तसेच, अलिबाग तालुका हा देखील पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. दरवर्षी लाखो पर्यटक याठिकाणी भेटी देत असतात. अलिबाग तालुक्यातील मांडवा, आवास याठिकाणांनंतर नागाव समुद्रकिनारा देखील पर्यटकांच्या पसंतीला उतरत आहे. मात्र, या ठिकाणी कॉटेज, रिसॉर्ट, हॉटेल्स यांच्यात मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. दरवर्षी या ठिकाणी नव्याने बांधकाम होताना दिसत आहे. पर्यटक या ठिकाणी समुद्रकिनाऱ्यावर मज्जा करायला आणि गर्द झाडीतील शांतता अनुभवण्यासाठी येत असतात. परंतु, या ठिकाणी रिसॉट, कॉटेज किंवा हॉटेल बांधण्यासाठी सर्रास नारळी-पोफळीच्या बागा उद्ध्वस्त केल्या जात आहेत. जर याठिकाणी देखील कॉंक्रीटची जंगले होणार असतील तर पर्यटक शहरातच कुटुंबियांसोबत वेळ घालवतील. त्यामुळे भविष्यात पर्यटन व्यवसाय धोक्यात येण्याची भीती ग्रामस्थांमध्ये आहे.

तसेच, मुख्य रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढिगारे रचले जात आहेत. या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांचे स्वागत या कचऱ्यातून होते. पर्यटकांना आपले नाक दाबून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे हा कचरा नसून विकास नावाच्या राक्षसाची विष्ठा असल्याचे सर्वसामान्यांतून बोलले जात आहे. त्यात नुकतेच तालुक्यातील रस्त्याच्या रूंदीकरणासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजू जेबीच्या सहाय्याने साफ करण्यात आल्या. त्यात शेकडो झाडांच्या खुलेआम कत्तली झाल्या. त्यामुळे रस्त्यावरून जाणारा वाटसरू पुर्णतः पोरका झाला.

मायेच्या उबेसारखी भर उन्हात सावली देणारी वृक्षे आता नष्ट झाली. लोकांनी स्टेटस लावले, परंतु कत्तल होत असताना एकही त्यांना आडवा गेला नाही याचं मोठ दुःख. त्याच ठिकाणी एखाद्या पशुची कत्तल झाल असती तर शेकडोच्या संख्येने लोक जमली असती. परंतु, आपल्याला जीवदान देणाऱ्या झाडांची कत्तल उघड्या डोळ्यांनी पाहिली. हे असेच राहिले तर विकास नावाचा राक्षस आपल्यालाही कधी फस्त करेल, याचा नेम नाही. त्यामुळे त्याला वेळेतच रोखले पाहिजे. त्यासाठी सत्ताधारी दुरच राहिले, निदान सर्वसामान्यांनी तरी एकत्र येऊन यासाठी आवाज उठविणे गरजेचे असल्याचे तेही दबक्या आवाजात बोलले जात आहे. कारण, सत्ताधिकारी हेच 'विकास' नावाच्या राक्षसाला पोसत असल्याचे चित्र समोर येत आहे.

लोकसंसद

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक निर्णय

देहलीमध्ये सहा वर्षापूर्वी दंगल उसळली होती. या दंगलीचे सूत्रधार असणारे सरजील इमाम आणि उमर खालिद यांचा जामीन अर्ज रद्दबादल करण्यात आला. याविषयीचे सविस्तर वृत्त असे की अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प त्यावेळी भारत भेटीवर आले होते याचवेळी ही दंगल करण्यात आली. अंतस्थ हेतू हा होता की भारताची प्रतिमा आंतरराष्ट्रीय स्तरावर मलीन व्हावी. एकेकाळी कानून मंत्री आणि विदेश मंत्री म्हणून कार्यरत असलेले सलमान खुर्शीद यांचा या दंगलीला पाठिंबा होता. या दंगली मध्ये ''भारत तेरे टुकडे होंगे इन्शाल्ला इन्शाल्ला'' अशा घोषणा उयर खालीद देत होता तर संसदेवर हल्ला केला म्हणून ज्या अफजल गुरुला फाशी देण्यात आले होते त्या अफजल गुरूसाठी''अफजल की फाशी नही सहेंगे कितने अफजल मारोगे घर घर से अफजल निकलेगा' अशा घोषणा उमर खालीदने दिल्या होत्या दुर्दैवाची आणि शरमेची गोष्ट अशी की अशा देशद्रोही व्यक्तींचे वकीलपत्र काँग्रेसमध्ये उच्चपदस्थ असलेल्या सलमान खुर्शीद, कपिल सिबल आणि मनु संघवी या वकिलांनी घेतले होते. सलमान खुर्शीद यांनी काँग्रेसच्या राजवटीत विदेश मंत्री पद आणि कायदामंत्री पद भूषवलेले होते. खालच्या न्यायालयात अनेक वेळा यांचा जामीन अर्ज फेटाळला गेला होता. तरीही सर्वोच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज दिला होता. अर्ज देऊन सुनावणीच्या वेळी अनुपस्थित राहून वेळ काढू पणा करणे असा त्यांचा खेळ चालू होता. एकदा अर्ज दाखल केल्यावर सुनावणीच्या वेळी न्यायालयात उपस्थित राहणे बंधनकारक आहे असा न्यायालयाने निर्णय दिला. त्यामुळे न्यायालयाला झुलवत ठेवण्याचा खेळ बंद पडला. अनेक वर्ष तुरुंगात आहेत म्हणून आरोपींना जामीन मिळावा हे आरोपींच्या वकिलांचे म्हणणे अमान्य करून ज्या व्यक्तीमुळे देशाच्या सुरक्षिततेला धोका आहे अशा व्यक्तींना जामीन देता येत नाही राष्ट्रीय सुरक्षा महत्त्वाची आहे असे न्यायालयाने स्पष्ट केले न्यायालयाची आणि पर्यायाने भारताची प्रतिमा मलिन करण्याचा हा एक गंभीर कट होता. काँग्रेस म्हणजे देशावरचे एक संकटच आहे आणि देश संकट मुक्त व्हावा असेच सर्व राष्ट्रप्रेमी नागरिकांना का वाटते या प्रश्नाचे उत्तर यात मिळते.

**श्रीमती संध्या काटदरे**

विशेष

# पतंगराव नव्हे रॉकेटराव !

महाराष्ट्रातील राजकारणात जवळपास तीस वर्ष आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमविणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले काँग्रेसचे जेष्ठ नेते, महाराष्ट्राचे माजी मंत्री पतंगराव कदम यांची आज ८२ वी जयंती. ८२ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ८ जानेवारी १९४४ रोजी पतंगराव कदम यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील सोनसळ या गावात एका गरीब कुटुंबात झाला. त्यांचे चौथी पर्यंतचे शिक्षण गावातल्या शाळेत झाले तर सातवी पर्यंतचे शिक्षण शिरसगाव या गावात झाले. ११ वी पर्यंतचे शिक्षण म्हणजे त्या काळातील मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण त्यांनी कमवा व शिका योजनेअंतर्गत पूर्ण केले. एफ. वाय बी. ए नंतर त्यांनी टीचर्स डिप्लोमा पूर्ण केला व शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बांधून पुणे गाठले. पुण्यातील हडपसर येथे दहा बाय दहाच्या पत्र्याच्या खोलीत राहून त्यांनी गोरगरिबांच्या मुलांना शिकवण्याचे काम सुरू केले. शिक्षक असतानाच गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी काही तरी करावे असा विचार त्यांच्या मनात येऊ लागला त्यातूनच, भारती विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली गेली. १० मे १९६४ रोजी भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्यावेळी त्यांच्या खिशात अवघे ३८ रुपये होते. भारती विद्यापीठामुळे गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजीतून शिक्षण मिळू लागले. सर्वसामान्य कुटुंबातील मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. त्यांनी लावलेल्या भारती विद्यापीठाच्या रोपट्याचे आज वटवृक्ष बनले आहे. के.जी ते पी.जे असे सर्वप्रकारचे शिक्षण आज भारती विद्यापीठातून मिळत आहे. भारती विद्यापीठाचा पसारा सांभाळीत त्यांनी राजकारणातही ठसा उमटविला. १९६८ साली एस टी महामंडळाच्या सदस्यपदी त्यांची निवड झाली. गाव तिथे एस टी ही योजना राबवून त्यांनी गावागावात एस टी पोहचवली. १९८५ साली त्यांनी अपक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवली. त्यात ते विजयी झाले. १९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत त्यांना काँग्रेसने त्यांना तिकीट दिले तेंव्हापासून १९९५ सालचा अपवाद वगळता ते सतत निवडून आले. २०१४ साली मोदी लाटेत अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला पण त्यांनी आपला गड राखला. या दरम्यान त्यांनी शिक्षण, सहकार, उद्योग, महसूल, वन या महत्वाच्या खात्याची मंत्रीपदे सांभाळली. काँग्रेस पक्षावर त्यांची नितांत श्रद्धा होती. सत्ता असो वा नसो काँग्रेस पक्षाशी ते कायम एकनिष्ठ राहिले. प्रत्येकवेळी मुख्यमंत्र्यांच्या स्पर्धेत त्यांचे नाव कायम चर्चेत असायचे, पण दुर्दैवाने ते मुख्यमंत्री बनू शकले नाही. तरीही त्यांनी याबाबत कधीही जाहीर नाराजी व्यक्त केली नाही. पक्ष सोडण्याचा विचारही त्यांच्या मनात कधी आला नाही. आजच्या आयाराम गयाराम संस्कृतीत पतंगरावांची निष्ठा उठून दिसते. पतंगराव तरुण पिढीसाठी मार्गदर्शक आहेत. बेधडक आणि मनमोकळा स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य होते. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणण्याची त्यांची वृत्ती राजकारणात अभावानेच पाहायला मिळते. त्यांचे भाषण म्हणजे पर्वणीच. त्यांच्या भाषणात गावाकडचा रांगडेपणा असायचा. कार्यकर्त्यांचा गराडा कायम त्यांच्यासोबत असायचा. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला पतंगरावांनाच बोलवायचे असा कार्यकर्त्यांचा आग्रह असायचा. त्यांच्या कामाचा धडाका देखील जबरदस्त असायचा. आपल्या मतदारसंघात त्यांनी कामाचा डोंगर उभा केला होता. आपल्या मतदारसंघात एमआयडीसी उभारून त्यांनी अनेक उद्योगधंदे आणले. सूत गिरण्या, साखर कारखाने, वाईन पार्क, भारती विद्यापीठ, भारती हॉस्पिटल उभारून मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती केली. त्यांच्या कामाचा झपाटा इतका असायचा की, एकदा पु. ल. देशपांडे म्हणाले की, हे पतंगराव नव्हेत तर रॉकेटराव आहेत. पतंगराव कदम यांनी सहकार क्षेत्रातही आपला ठसा उमटविला. ९ मार्च २०१८ रोजी पतंगराव कदम यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक असामान्य व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली. पतंगराव कदम यांना ८२ व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार, पुणे**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**८ जानेवारी**

१) श्री.वसंत हरि कवळे
विद्यानगर, अलिबाग, ८-१-१९४४
२) श्रीम.प्रतिभा अनंत देवघरकर
अलिबाग, ८-१-१९५०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचाफोटोकृषीवलमध्येछापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**दूर्वेश नितीन म्हात्रे स्मरणार्थ अलिबाग**
**निवेद माणिक मानाजी, स्मरणार्थ अलिबाग**

# नद्या कचऱ्यात, आरोग्य धोक्यात

## ● प्रशासनाचे दुर्लक्ष; पावसाळ्यापूर्वी उपाययोजना करण्याची मागणी

**| खेड | प्रतिनिधी |**

खेड तालुक्यातील जगबुडीसह नारिंगी, चोरद व अन्य नदीपात्रात गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे. नद्यांमध्ये मानवनिर्मित कचरा फेकणाऱ्यांची संख्यादेखील वाढत आहे. नदीच्या पात्रात साचलेल्या वाळूच्या टेकड्यामुळे नैसर्गिक संकट असताना शासनाचा संबंधित विभाग मात्र याबाबत उपाययोजना करताना दिसत नाही. गेल्यावर्षी झालेल्या अतिवृष्टीत सह्याद्रीतून वाहून आलेला हजारो टन गाळ यावर्षीच्या पावसाळ्यात नदी किनाऱ्यावरील वस्त्यांची डोकेदुखी ठरू शकतो. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.



जगबुडी या प्रमुख नदीमध्ये तर खाडी परिसरात मोठ्या प्रमाणात गाळाची बेटे तयार झाली आहेत. त्यातच या नदीच्या किनाऱ्यावरील लोकवस्त्यातून नदीपात्रात कचरा फेकला जात असल्याने नदीपात्रात कचरा तरंगू लागला आहे. नदीपात्र कचऱ्याने भरले आहे. जगबुडी नदी पात्रात मगरींचा वावर असून गेल्या वर्षभरात काही मगरी मेल्या आहेत. प्रदूषण वाढल्यानेच त्यांचा मृत्यू झाल्याची चर्चा आहे.

नदीपात्रात रात्री अपरात्री कचरा फेकण्याचे प्रमाण वाढले आहे. फळ विक्रेते, चिकन मटण, मासे विक्रेते नदीपात्रात कचरा फेकत असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र नगरपरिषद प्रशासन सध्या कारवाईसाठी पुढाकार घेत नाही. जगबुडी नदी पात्रात कचरा वाढल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

कचऱ्यामुळे नदीपात्र पुन्हा बकाल झाले आहे. जगबुडी नदीपात्रात केवळ मानवनिर्मित कचराच साचलेला नसून पावसाळ्यात सह्याद्रीच्या रांगांतून मोठ्या प्रमाणात वाहून आणलेला गाळ, ओंडके व पालापाचोळा यांचा देखील त्यात समावेश आहे.

जगबुडी नदी खेड शहरानजीक खाडीला जोडली जाण्याच्या शेवटच्या टप्प्यात प्रवाहित होते. त्यामुळे तिचा प्रवाह संथ होतो. या टप्प्यात नदीपात्रातील वळणाच्या ठिकाणी नदीने वाहून आणलेला गाळ साचून अनेक लहान-मोठी बेट तयार झाली असून त्या ठिकाणी नदीपात्रात ओहोटी काळात कचरा साचून राहतो. भरतीच्या काळात खाडी भागात गाळाच्या बेटात साचलेला कचरा जगबुडी नदी पात्रात पुन्हा वाहून येतो. त्यामुळे भरतीच्या कालावधीत शहरानजीक जगबुडी नदीपात्रात कुजलेला पाला पाचोळा व मानवनिर्मित फेकलेला कचऱ्यांचे ढीग पाण्यावर तरंगताना पहाला मिळत आहेत.

### संवर्धनासाठी लोक चळवळीची गरज

जगबुडी नदीतील स्वच्छ पाणी कचऱ्याद्वारे दूषित करण्याचे कृत्य केले जात आहे. हे प्रकार तातडीने थांबायला हवेत. जगबुडी संवर्धनासाठी लोक चळवळीची नितांत गरज असून, जगबुडी नदी वाचवण्यासाठी नागरिकांनी उत्स्फूर्तपणे पुढाकार घ्यायला हवा. अलसफा वेल्फेअरच्या माध्यमातून जगबुडी नदी संवर्धनाची मोहीम यापुढील काळात देखील सुरु ठेवण्यात यावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमींकडून प्रशासनाकडे होत आहे.

## विजेच्या धक्क्याने वायरमनचा मृत्यू

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

राजापूर तालुक्यातील पेंडखळे भवानी मंदिर येथे विजेच्या खांबावर काम करत असताना विजेच्या तीव्र धक्क्याने तरुण वायरमनचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना मंगळवारी (दि.६) सायंकाळी घडली असून अनिकेत परवडी (वय २७, रा. तिथवली, ता.राजापूर) असे मृत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पेंडखळे येथील भवानी मंदिर परिसरात वीज वाहिनीमध्ये बिघाड झाला होता. ही दुरुस्ती करण्यासाठी अनिकेत खांबावर चढला होता. खांबावर चढण्यापूर्वी ऑपरेटरकडून संबंधित वीज वाहिनीचा प्रवाह बंद करण्यात आला होता, असे सांगण्यात येत आहे. मात्र, दुरुस्तीचे काम सुरू असतानाच त्याला विजेचा जोरदार धक्का बसला. हा धक्का इतका तीव्र होता की, तो खांबावरून थेट खाली कोसळला.

अपघातानंतर त्याला तातडीने उपचारासाठी राजापूर ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. अनिकेतच्या निधनाने तिथवलीसह राजापूर शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, वीज प्रवाह परत कसा सुरु झाला, याबाबत चौकशी सुरु आहे.

## मल्टी स्किल टेक्निशियन प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र वितरण

**| वावोशी | प्रतिनिधी |**

परखंदेवाडी येथे एएके प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या कौशल्य विकास कार्यक्रमातील मल्टी स्किल टेक्निशियन प्रशिक्षणाचा प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्साहात पार पडला. हा उपक्रम होराळे ग्रुप ग्रामपंचायत व उन्नत्व फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे.




या कार्यक्रमाला एएके प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे सीएसआर हेड संदीप निमसे, होराळे ग्रुप ग्रामपंचायतचे मा. उपसरपंच नागेश पाटील तसेच उन्नत्व फाउंडेशनतर्फे प्रोजेक्ट कॉर्डिनेटर शारदा माकोने, उमेश फणसे व कुणाल जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश परिसरातील बेरोजगार युवकांची तांत्रिक कौशल्ये विकसित करून त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

उन्नत्व फाउंडेशनच्या माध्यमातून हे प्रशिक्षण संपूर्ण खालापूर तालुक्यात यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. या प्रशिक्षणाचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे.

## गहाळ मोबाईलचा यशस्वी शोध

**चिपळूण :** अनेकवेळा एसटीए, रेल्वे प्रवासात याशिवाय अन्यत्र मोबाईल गहाळ होत असतात. त्याची चोरी देखील होत असते. या मोबाईलचा शोध घेण्यासाठी पोलीस ठाण्यात अर्ज केले जातात. त्यानुसार या मोबाईलचा शोध घेतला जातो व पोलिसांत नोंद ठेवली जाते. असे तपासात मिळालेले तब्बल ४४ मोबाईल संबंधीत मालकांना परत देण्यात आले. जिल्हा पोलीस अधिक्षक नितीन बगाटे, अप्पर पोलीस अधिक्षक महामूनी, चिपळूण डीवायएसपी प्रकाश बेले, पोलीस निरीक्षक मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संतोष शिंदे, वर्षा रहाटे यांनी गहाळ मोबाईलचा शोध घेतला आणि ५८ मोबाईल शोधण्यात यश आले. त्यातील ४४ मोबाईल मूळ मालकांना परत देण्यात आले.

## डिजिटल साक्षरता प्रशिक्षण उपक्रम

**● ३० महिलांचा उत्स्फूर्त सहभाग**

**| वावोशी | प्रतिनिधी |**

टाटा स्टील फाउंडेशनच्या महिला सक्षमीकरण उपक्रमांतर्गत वावोशी भीमनगर येथे महिलांसाठी दोन दिवसीय डिजिटल लिटरसी प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. या प्रशिक्षणात परिसरातील तब्बल ३० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत डिजिटल साक्षरतेकडे महत्त्वपूर्ण पाऊल टाकले.

महिलांना डिजिटल तंत्रज्ञानाबाबत सक्षम बनवणे, शासकीय योजनांचा स्वतःहून लाभ घेता यावा, तसेच दैनंदिन जीवनात मोबाईलचा सुरक्षित व प्रभावी वापर करता यावा, हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता. टाटा स्टील फाउंडेशनच्या फिल्ड कोऑर्डिनेटर करूणा कदम यांनी सांगितले की, आज महिलांचे आर्थिक स्वावलंबन वाढत असताना डिजिटल व तांत्रिक साक्षरता ही काळाची गरज बनली आहे. योग्य माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर केल्यास महिलांना कोणावरही अवलंबून राहावे लागणार नाही.

यावेळी या प्रशिक्षणादरम्यान डिजिलॉकर, मेरा रेशन, ई-आधार, आयुष्यमान भारत योजना यांसह सायबर सुरक्षितता व मोबाईल सेफ्टीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच चाटजिपिटी व जेमिनी यांसारख्या आधुनिक डिजिटल साधनांच्या सहाय्याने शासकीय अर्ज कसे लिहावेत याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. यासोबतच स्त्रीपुरुष समानता या विषयावरही महिलांमध्ये जागृती करण्यात आली. प्रशिक्षक रंजना राणे यांनी महिलांच्या मोबाईलमध्ये आवश्यक ॲप्स डाउनलोड करून त्यांचा वापर कसा करायचा, हे प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगितले.

## शेती-उद्योगविषयक प्रकल्प प्रशिक्षण



**| कोर्लई | प्रतिनिधी |**

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, पाणलोट विकास घटक (२.०) अंर्तगत भारतीय बहुउद्देशीय खादी १ ग्रामोद्योग शिक्षण संस्था, वर्धा या संस्थेतर्फे मुरुड तालुक्यातील उसरोली येथील पंचक्रोशी आगरी समाज हॉलमध्ये शेती-उद्योग विषयक प्रकल्प प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये आदाड, खारदोडकुळे, उसरोली, खारिकवाडा परिसरातील शेतकरी व नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष यशवंत होले तसेच प्रशिक्षक म्हणून लाभलेले शंकर नागतोडे, अशोक कुंभरे, राहुल चिकाटे, माजी सरपंच महेश पाटील, जयेश नांदगावकर, शिवसेना शाखा प्रमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

## उल्हासनगर पालिकेची डिजिटल क्रांती

**| ठाणे | प्रतिनिधी |**

उल्हासनगर पालिकेने एक पोर्टल तयार केले आले. त्यामुळे या पालिका निवडणुकीत मतदारांना एका क्लिकवर व्होटर स्लिप, मतदान केंद्राचा पत्ता मिळणार आहे. डिजिटल क्रांती केलेली उल्हासनगर ही राज्यातील पहिली पालिका असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

पोर्टल तसेच महापालिकेच्या मुख्य संकेतस्थळावर निवडणुकीशी संबंधित सर्व महत्त्वाचे दस्तऐवज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच वैध नामनिर्देशन पत्रे आणि माघार घेतलेल्या उमेदवारांची यादी, प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी आणि पुरवणी मतदार यादी, प्रारूप व अंतिम प्रभागरचना आणि सुधारित अधिसूचना ही सर्व माहिती ऑनलाइन कळणार आहे. https://umc. localbody. org, https://umcvoter-search.com, https:// www.umc. gov.in या लिंकवर क्लिक केल्यानंतर पालिका निवडणुकीसंबंधी सर्व माहिती मतदारांना मिळणार आहे. या पोर्टलच्या उद्घाटनप्रसंगी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मनीषा आव्हाळे, अतिरिक्त आयुक्त किशोर गवस, निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब तिडके, गणेश सांगळे, जनसंपर्क अधिकारी अजय साबळे, सहाय्यक आयुक्त गणेश शिंपी उपस्थित होते.

## वलंग हायस्कूलमध्ये वाचन जनजागृती

**| महाड | प्रतिनिधी |**

महाड पत्रकार संघाच्यावतीने मराठी पत्रकार दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील वलंग हायस्कूलमध्ये वाचन जनजागृती अभियान राबवले.




वलंग हायस्कूलमध्ये आयोजित केलेल्या या कार्यक्रमांमध्ये शाळेचे मुख्याध्यापक राजन कुर्डुनकर, महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष उदय सावंत, उपाध्यक्ष महेश शिंदे, ज्येष्ठ पत्रकार गोपाळ कांबळे, श्रीकांत सहस्त्रबुद्धे यांसह अन्य पत्रकार उपस्थित होते. यावेळी प्रास्ताविकपर भाषणामध्ये पत्रकार महेश शिंदे यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेऊन पत्रकारिता हा विषय महाविद्यालय आणि विद्यालय विद्यार्थ्यांनी समजून घेतला पाहिजे, असे सांगितले. तर मुख्याध्यापक राजन कुर्डूनकर यांनी समाजाच्या विकासाच्या जडणघडणीमध्ये पत्रकारांचे अनमोल असे योगदान असते. त्यांच्या बेधडक लिखाणामुळे अन्यायाला वाचा फोडून न्याय देण्याचे काम होत असते, असे सांगितले. तर आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये उदय सावंत यांनी देखील विद्यार्थी मित्रांना मार्गदर्शन करताना पत्रकार म्हणून पुढे येण्यासाठी विद्यार्थी मित्रांनी सामाजिक दृष्टिकोन समोर ठेवून काम केले पाहिजे. तरच पत्रकारिता जवळून अनुभवता येईल, असे सांगितले.


**एनएसएस विभागाचा अभिनव उपक्रम** | **पन्नास विद्यार्थ्यांचा सहभाग**

# तळोशी गावाच्या जैवविविधतेचा बनविला नकाशा

**| महाड | प्रतिनिधी |**

लोकविकास सामाजिक संस्थेच्या एम. एम. जगताप महाविद्यालयाचे सात दिवसीय 'विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर' महाड तालुक्यातील रायगड खोऱ्यातील तळोशी या गावांमध्ये सुरू आहे. शिबिरार्थींच्या मदतीने गावातील जैवविविधतेचे मॅपिंग करून देण्याचा अभिनव उपक्रम एनएसएस विभागाकडून राबविला जात आहे.

यानिमित्ताने सात दिवस विद्यार्थ्यांना विविध विषयांवर तज्ञ मंडळींचा व्याख्यानाचा आणि त्यांचा अनुभवांचा लाभ घेता आला.



सहाव्या दिवशी या शिबिरामध्ये डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या प्राध्यापिका वनस्पतीतज्ञ डॉ. पंचफुला निंगडाळे यांचे आपल्या परिसरातील वृक्ष आणि वनस्पती या विषयावर तसेच गणेश खातू यांचे ग्राम सुधारणेसाठी आणि उन्नतीसाठी गावातील उपलब्ध वृक्षवल्ली यांचा कसा उपयोग होऊ शकतो, हे पीपीटी प्रदर्शनाच्या माध्यमातून सादरीकरण करण्यात आले. या श्रमसंस्कार शिबिरामध्ये पन्नास विद्यार्थ्यांचा सहभाग आहे.

याप्रसंगी गावातील बचत गटांच्या महिला आणि ग्रामस्थ हजर होते. गावाच्या सरपंच साक्षी सचिन पार्टे यांनी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या जैवविविधता उपक्रमास पाठिंबा दिला. स्थानिक झाडांची वेलींची नावे गावकऱ्यांच्या मदतीने समजावून घेऊन त्याप्रमाणे काम सुरू आहे.

जगताप महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाकडून घेण्यात येणाऱ्या अनेक समाज उपयोगी समाजाभिमुख उपक्रमांतर्गत व्यापक जैवविविधता सर्वेक्षण तळोशी गावामध्ये सुरू केले आहे. यामध्ये जैवविविधता मॅपिंग उपक्रम अंतर्गत गावातील दुर्मिळ वृक्ष, वनस्पती, पक्षी आणि वन्यप्राणी यांविषयी विद्यार्थ्यांच्या मार्फत माहिती गोळा करून ती माहिती ग्रामपंचायतीस सुपूर्त करण्याचा उपक्रम राबविला जाणार आहे. अशी माहिती प्राचार्य डॉ. अंजय धनावडे यांनी दिली. या जैवविविधता नोंदणीचा वापर गावाच्या शाश्वत विकासासाठी करता येईल, असेही ते पुढे म्हणाले.

जैवविविधता नोंदणी अंतर्गत तळोशी येथील श्रीदेवी रंगू माता देवराई परिसरात सर्पगंधासारख्या दुर्मिळ अस्तंगत झालेल्या यादीतील वनस्पती आढळली आहे. झाडांची संख्या मोजण्याव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांनी स्थानिक वनस्पतींबद्दल तपशीलवार माहिती घेतली. ज्यामध्ये औषधी वनस्पती, झुडुपे, वनस्पती किंवा झाडे म्हणून त्यांचे वर्गीकरण, प्रजाती दुर्मिळ आहेत की सामान्य आहेत, त्यांची उंची, अधिवास असे दस्तऐवजीकरण या दिवसात केले गेले. हे काम पुढेही सुरू राहणार आहे.

एनएसएसचे श्रमसंस्कार शिबिर विभागाच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. कल्याणी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. महाविद्यालयाच्या वनस्पती विभागाच्या आणि एनएसएसच्या समन्वयक प्रा. अनामिका खर्डेकर यांच्या मदतीने ५० विद्यार्थ्यांसह गावाच्या परिसरातील दुर्मिळ वृक्ष मोजणी आणि त्यांचे विविध प्रकार नोंदण्याचे महत्त्वपूर्ण काम हाती घेतले आहे.

## निवडक



### रवीप्रभा मित्र मंडळातर्फे नेत्र तपासणी

**म्हसळा :** श्रीरविप्रभा मित्र संस्था, म्हसळा, डोळ्यांचा दवाखाना म्हसळा व स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या चतुर्थ वर्धापन दिनानिमित्ताने मोफत नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले. हे शिबीर म्हसळा येथील डोळ्यांचे हॉस्पिटल येथे आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतात, तिमिरातून तेजाकडे या ब्रीदवाक्याप्रमाणेच संस्था अंधारातून प्रकाशाकडे नेणारे मोलाचे कार्य करीत आहे, असे नमूद केले. याप्रसंगी ३८ वर्षे निस्वार्थ सेवा करणारे नेत्र चिकित्सक डॉ. सलीम धलाईत यांना सर्वोत्कृष्ट जनसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिबिरात १०० हून अधिक लाभार्थ्यांनी मोफत नेत्र तपासणीचा लाभ घेतला. एसटी आगारातील चालक-वाहक कर्मचाऱ्यांनीही सहभाग नोंदविला. संस्थेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांच्या परिश्रमातून हे शिबीर यशस्वी झाले असून, पुढेही असे समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा संकल्प संस्थेचे अध्यक्ष रवींद्र लाड यांनी व्यक्त केला.



### विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन सत्र

**आगरदांडा :** कोकण उन्नती मित्र मंडळाचे वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, बॅरिस्टर ए.आर. अंतुले कॅम्पस, मुरुड जंजिरा आणि इन्स्टिट्यूट ऑफ मेकॅनिकल इंजिनिअरिंग पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी करिअर समुपदेशन व सीईटी परीक्षेच्या तयारीसाठी मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ.जनार्दन कांबळे, अपस्केल एज्युकेशन अतुल जोशी, सौरभ सुभेदार, डॉ. श्रीशैल बहिरगुडे, डॉ. सुभाष म्हात्रे, डॉ. नारायण बागुल, डॉ. सीमा नाहिद, सहाय्यक प्राध्यापक सिद्धेश सतविडकर, रुफी हसवरे, प्रवेश पाटील आणि मुस्कान रज्जब, प्रा. प्रणव बागवे, चिंतन पोतदार, प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे यांनी विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी योग्य मार्गदर्शनाचे महत्त्व सांगितले. एमबीए व वाणिज्य विषयाचे अभ्यासक सीईओ, अपस्केल एज्युकेशन- अतुल जोशी यांनी विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधी, सीईटी परीक्षेची तयारी कशी करावी, कौशल्य विकास आणि शिक्षण क्षेत्रातील नवीन प्रवाह, याबाबत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना मोठी प्रेरणा मिळाली. तर सौरभ सुभेदार यांनी व्यावसायिक अभ्यासक्रम, मॅनेजमेंट शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील अपेक्षा याबद्दल उपयुक्त माहिती दिली.



### संजय गुंजाळ यांचा सन्मान

**कोर्लई :** कोकण मराठी साहित्य परिषदेचे रायगड जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ यांना महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळाचा सन २०२५चा कोकणरत्न पुरस्कार प्राप्त झाला. याबद्दल अलिबाग येथील क्षात्रैक्य समाजाचे अध्यक्ष द्वारकानाथ उर्फ कबन नाईक यांनी मुरुडमधील महात्मा फुले पतसंस्थेच्या सभागृहात संजय गुंजाळ यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. महात्मा फुले पतसंस्थेचे चेअरमन अजित गुरव व संचालक मनोहर गुरव, नवनिर्वाचित नगरसेवक आदेश दांडेकर, अनघा चौलकर, उदय दांडेकर, प्रवीण भायदे, चेअरमन अजित गुरव, मॅनेजर राकेश मसाल यावेळी उपस्थित होते. क्षात्रैक्य समाजाच्या अलिबाग कुरुळ येथील कै.नंदकुमार नाईक सभागृहात संस्थेचा रौप्यमहोत्सवी वर्धापन दिन व वधू-वर परिचय मेळावा रविवार दि.११ जानेवारी रोजी होणार आहे. समाजातील गुणवंतांचा गौरव करणे आणि त्याच्या उल्लेखनीय कामाची समाजाला ओळख करुन देणे हे संस्थेचे प्रमुख उद्दीष्ट आहे. या भूमिकेतून संस्थेने वर्धापन दिनी कोकण रत्न पुरस्कार प्राप्त संजय गुंजाळ यांचा सत्कार करण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमास उपस्थित राहाण्याचे निमंत्रण यावेळी कबन नाईक यांनी गुंजाळ यांना दिले.



### अरुण पवार पुरस्काराने सन्मानित

**माणगाव :** माणगाव येथील जेष्ठ पत्रकार रायगड भूषण पुरस्कार प्राप्त अरुण तुकाराम पवार यांना पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल स्व.माजी आ. मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट अलिबाग, भाई जगताप मित्रमंडळ रायगड, ॲड. उमेश ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्काराचा कार्यक्रम शनिवारी (दि.३) सायंकाळी सातिर्जे, ता.अलिबाग या ठिकाणी उत्साहात पार पडला. अरुण पवार हे गेली ४० वर्ष पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी रायगड जिल्ह्यातील तसेच माणगाव तालुक्यातील विविध प्रश्न, समस्यावर आवाज उठून आपल्या धारदार अशा निर्भीड लेखणीने अनेक समस्या मार्गी लावल्या आहेत. पत्रकारिता, सामाजिक, शैक्षणिक, कला व क्रीडा क्षेत्रात पवार यांचे उल्लेखनीय असे काम आहे. पत्रकारिता क्षेत्रातील योगदानामुळे त्यांना रायगड जिल्हा परिषदेतर्फे रायगड भूषण पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे. तसेच यापूर्वी पवार यांना अनेक तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पत्रकारितेबरोबरच सामाजिक कार्य करीत असताना रक्तदान शिबीर कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेत असतात.

# गणित शिक्षणाला मिळणार नवी दिशा

## ●आशिर्वाद फाऊंडेशनची 'मॅथ्स प्रीमियर लीग' ●विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी नवोपक्रम

**। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।**

गणित हे केवळ अभ्यासाचे विषय न राहता आनंददायी, सोपे आणि आत्मविश्वास वाढावा यासाठी श्री. मोहनलाल सोनी विद्यालय बोर्ली पंचतन येथे आशिर्वाद फाऊंडेशनतर्फे 'मॅथ्स प्रीमियर लीग'च्या गणित विषयी स्पर्धा भरवण्यात आल्या होत्या. या मॅथ्स प्रीमियर लीगच्या माध्यमातून श्रीवर्धन तालुक्यातील जनता शिक्षण संस्था संचलित श्री. मो. सो. विद्यालय बोर्ली, आदगाव, भरडखोल, मेंडदी अशा ५ शाळांमधील इयत्ता सातवी ते नववीच्या शंभरहून जास्त विद्यार्थ्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले होते.



गणित हे केवळ अभ्यासाचे विषय न राहता आनंददायी, सोपे आणि आत्मविश्वास वाढवणारे कसे बनू शकते, याचा अनुभव यावेळेस विद्यार्थ्यांना देण्यात आला.

स्पर्धेचे स्वरूप हे खेळाच्या धर्तीवर ठेवण्यात आले होते, प्रश्नमंजुषा, गणितीय कोडी, वेग व अचूकतेवर आधारित फेऱ्या अशा विविध टप्प्यांतून ही लीग पार पडण्यात आली. सर्व शाळांचे एकाहुन अधिक संघ बनवण्यात आले होते आणि विजेत्या संघांच्या विद्यार्थ्यांचा ट्रॉफी आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला.

आशीर्वाद फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश चव्हाण व फाऊंडेशनच्या सदस्यांमार्फत उपस्थित शिक्षकांच्या सहकार्याने आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी जे नवोपक्रम कार्यान्वित केले जात आहेत हे आपले कार्य कौतुकास्पद तद्वतच प्रेरणादायी आहे.

आजची गणितातील प्रीमियर लीग ही संकल्पना खूप छान झाली. त्यातून गणिताबद्दल असलेली भीती दूर होऊन विद्यार्थ्यांची रुची वाढेल स्पर्धा असल्याने मुलांनी तसेच शिक्षकांनी देखील हिरीरीने भाग घेतल्याचे जाणवले असे संदीप पाटील यावेळी म्हणाले.

### स्पर्धात्मक वृत्ती विकसित करणे

विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयीची भीती दूर करून त्यांच्यात गणिताची आवड निर्माण करणे, गणिताचा पाया भक्कम करणे तसेच विचारशक्ती, तार्किक क्षमता व स्पर्धात्मक वृत्ती विकसित करणे हा या मागचा हेतू आहे. शिक्षणासोबतच आनंददायी शिकण्याची संस्कृती रुजवणे. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध करून देणे असा आहे. याच बरोबर अशा स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करायचा आहे.

आशिर्वाद फाऊंडेशनच्या या नावीन्य पूर्ण उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये गणिताकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होईल, तसेच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला नक्कीच चालना मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माणगाव तालुक्यातील प्रा. रणपिसे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमप्रसंगी जनता शिक्षण संस्थेचे पदाधिकारी श्रीकांत तोडणकर, संदीप पाटील, प्रा. यळमंते, अमित पाटील, प्रशांत पाटील, तेजस कांबळे, नेहा शहा, वेदिका पिलणकर, श्रुष्टी अपराध तसेच आशिर्वाद फॉऊंडेशनचे अध्यक्ष राजेश चव्हाण, निखिल रिळकर, अक्षय पयेर, अनिकेत खोत, निशांत रिळकर यांनी विशेष सहकार्य केले. या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे पालकवर्गातून स्वागत करण्यात आले. तसेच उपक्रमास शुभेच्छा देण्यात आल्या.

---

# शालेय विद्यार्थ्यांनी अनुभवला पोलिसांचे कामकाज

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

पोलीस वर्धापन दिनाचे औचित्य साधून माणगाव पोलीस ठाण्याच्या वतीने एक स्तुत्य आणि अभिनव उपक्रम राबविण्यात आला. सुधाकर नारायण शिपुरकर इंग्रजी माध्यम शाळा व वाघरे इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पोलीस ठाण्याला भेट देत विद्यार्थ्यांना पोलिसांचे कामकाज, कायदे, शिस्त आणि समाजातील पोलिसांची भूमिका यांची प्रत्यक्ष ओळख करून देणे हा होता. मंगळवारी (दि.६) जानेवारी रोजी हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.



माणगाव पोलिसांनी विद्यार्थ्यांना पोलिसठाण्यातील दैनंदिन कामकाज, तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया, तपास पद्धती तसेच पोलिसांची जबाबदारी याविषयी अत्यंत सोप्या व समजेल अशा भाषेत माहिती दिली. वाहतूक व्यवस्था, रस्ते सुरक्षेचे नियम, हेल्मेट व सीट बेल्टचे महत्त्व सांगितले. या भेटी दरम्यान विद्यार्थ्यांना विविध प्रकारची पोलीस शस्त्रास्त्रे दाखविण्यात आली. गुन्हे कसे घडतात, त्यापासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, संशयास्पद बाबी दिसल्यास पोलिसांना कशी माहिती द्यावी, याचेही मार्गदर्शन करण्यात आले. सायबर गुन्हेगारी कशी वाढत आहे, मोबाईल व इंटरनेटचा सुरक्षित वापर कसा करावा, याबाबत सायबर पोलीस यंत्रणेचे कार्यही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. तसेच जप्त केलेला मुद्देमाल, पोलीस कोठडी, गुन्हे तपासाची साधने प्रत्यक्ष दाखविण्यात आल्याने विद्यार्थ्यांना पोलिसांचे कार्य अधिक जवळून अनुभवता आले.

# महाविद्यालयात पोलीस स्थापना दिवस साजरा

**। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।**

एसएनडीटी विद्यापीठाच्या महर्षी कर्वे आदर्श महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे शनिवारी (दि. ३) रोजी डॉ योगेश लोखंडे व प्रदीप राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती आणि महाराष्ट्र पोलीस स्थापना दिवस साजरा करण्यात आला.

याप्रसंगी सोमनाथ खाडे यांनी पोलीस दलात वापरात असलेल्या शस्त्रांची माहिती दिली. प्रदीप राठोड यांनी पोलीस दलाच्या स्थापनेची माहिती सांगितली.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार दिक्षा जावळेकर हिने मानले. शरयू नितीन लांगी हिने उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमासाठी प्रा. तृप्ती विचारे, प्रा.ऋषिकेश चोगले, प्रिया पवार, प्रभाकर चोगले, मनिषा श्रीवर्धनकर, अभिजित पुसाळकर, उपस्थित होते.

---

# पनवेलमध्ये करोडपती उमेदवार

**पनवेल** : महापालिकेच्या २० प्रभागांमध्ये एकूण २५५ उमेदवार आपले राजकीय नशीब आजमावत आहेत. निवडणुकीत उमेदवारांची प्रचंड संपत्ती हा आहे. प्रभाग क्र. १४ भाजप उमेदवार इकबाल हुसैन काझी यांची कौटुंबिक संपत्ती तब्बल १७१ कोटी रु. आहे. प्रभाग क्र. ४ मधू पाटील यांच्या कुटुंबाची संपत्ती १४० कोटींवर असून, प्रभाग क्र. ७ राजेंद्र शर्मा यांची संपत्ती ३० कोटी आहे. भाजपचे चंद्रकांत सोनी, संतोष शेट्टी आणि दशरथ म्हात्रे यांनीही १८ ते १९ कोटींच्या घरात संपत्ती दाखविली आहे.

# नवघर शाळेत 'लेक शिकवा अभियान'

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

बालिका दिनानिमित्त रजिप आदर्श शाळा नवघर शाळेत 'लेक शिकवा अभियान' प्रारंभ आणि बालविवाह मुक्त महाराष्ट्र संकल्प कार्यक्रमांतर्गत रॅलीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विविध घोषणा जसे बालपण वाचवा-बालविवाह घालवा, मुलगी शिकली-प्रगती झाली दिल्या गेल्या तसेच बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा घेतली गेली.



विद्यार्थीनी सावित्रीबाई फुले यांच्या वेषात सज्ज होऊन आपले मनोगत व्यक्त केले, तर मुले महात्मा जोतिराव फुले यांच्या वेषात येऊन त्यांचे विचार मांडले. सखी सावित्री समितीच्या सदस्या, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, महिला शिक्षिकांनी मार्गदर्शन केले.

यावेळी सर्वांनी 'लेक शिकवा अभियान'चा शुभारंभ केला. बालविवाहमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण पाऊल ठरला. याप्रसंगी संगीता बैकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# श्रीवर्धन पोलीस ठाण्यात 'रायझिंग डे' साजरा

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रात २ जानेवारी हा दिवस पोलीस स्थापन दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने ०२ ते ०७ जानेवारी दरम्यान 'रायझिंग डे' हा सप्ताह अनेक शाळांमध्ये पोलिसांच्या वतीने आयोजित केला जातो. या सप्ताहात विद्यार्थ्यांना कायदेविषयक आणि स्वरक्षणाविषयक माहिती देऊन जनजागृती करण्याचा प्रयत्न असतो. त्याचाच एक भाग म्हणून श्रीवर्धन पोलीस ठाणे मार्फत 'रायझिंग डे' चे आयोजन करण्यात आले होते.



पोलीस ठाणे प्रांगणात बुधवारी (दि.७) जानेवारी रोजी पार पडलेल्या सप्ताह वेळी श्रीवर्धन उपविभागीय पोलिस अधिकारी सविता गर्जे यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्यार्थ्यांना वाईट प्रवृत्ती पासून दूर रहा व मुलींना आपले संरक्षण स्वतः करा, असा सल्ला दिला. यावेळी विद्यार्थ्यांना पोलिसांकडे उपलब्ध असलेल्या विविध शस्त्राची माहिती देऊन त्यांच्या शंकांचे निरसन केले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन लकडे, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप राठोड व संदीप पाटील ज्ञानेश्वरी बामणेकर, कांचन जवान उपस्थित होते.

---

# मोदक स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

जनसेवेतून आनंद देणाऱ्या वशेणी इतिहास संपादकीय मंडळातर्फे मंगळवारी (दि.६) संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने मोदक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत परिसरातील महिलांनी सहभाग घेत, मोदक स्पर्धेचा आनंद द्विगुणित केला.



गणरायाला आवडणाऱ्या २१ मोदकांचे उद्दिष्ट समोर ठेवून, स्पर्धेतील नियोजित २१ महिलांनी विविध आकाराचे, मोदक बनविले होते. स्पर्धेचे परीक्षण रवींद्र पाटील, समता ठाकूर, संजीव पाटील, विजया भगत, शितल माळी यांनी केले. स्पर्धेत अश्विनी ठाकूर (प्रथम) निकिता पाटील (द्वितीय) रूपाली पाटील (तृतीय) यांच्यासह उत्तेजनार्थ अक्षता पाटील, सुवर्णा म्हात्रे, सुचिता ठाकूर या महिला मोदक स्पर्धेच्या विजेत्या ठरल्या.

# पोलीस मित्र संघटनेच्या उपोषणाला यश

### रस्त्यावरील खड्ड्यांची मलमपट्टी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कर्जत -कोंडीवडे राज्य मार्ग रस्त्याची दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावरील खड्डे भरून व्यवस्थित करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पोलीस मित्र संघटनेचे अध्यक्ष रमेश कदम यांनी पत्रव्यवहार केल्यानंतर त्यांना खड्डे भरले जातील असे लेखी आश्वासन दिले होते. तालुक्यातील कुठेही रस्त्यावरील खड्डे न भरण्यात आल्यामुळे पोलीस मित्र संघटनेने उपोषणाला सुरुवात केली होती.



कर्जत आणि खालापूर तालुक्यातील रस्त्यांवरील खड्डे भरण्यात येत नसल्याने पोलीस मित्र संघटनेने गतवर्षी दोनवेळा उपोषण केले होते. तसेच लेखी निवेदन देऊन देखील सार्वजनिक बांधकाम खात्याने कोणत्याही प्रकारची कामे केली नव्हती. त्यामुळे पोलीस मित्र संघटनेचे कोंकण प्रदेश अध्यक्ष कदम यांनी उपोषण सुरु केले होते. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता देवांग यांनी उपोषणस्थळी भेट देऊन खड्डे भरण्याची कामे तात्काळ सुरु करण्यात आली. तसेच डांबरीकरण १५ दिवसात म्हणजे २१ जानेवारी रोजी सुरू करण्यात येईल असे, लेखी आश्वासन दिल्यानंतर कदम यांनी या पत्राच्या आधारे उपोषण स्थगित केले असून खड्डे भरण्याचे काम सुरू केले आहे. त्यामुळे या उपोषणाला यश आले आहे.

---


# निवडक



## आंब्यांच्या झाडांना पोषक वातावरण

**अलिबाग** : गेली आठ-दहा दिवस पडत असलेली हुडहुडी भरणारी थंडीमुळे खरीप हंगामातील कडधान्यासह आंबा कलमांना पोषक वातावरण बनत चालले आहे. आंबा झाडांना पोषक असे वातावरण तयार झाले आहे. हे वातावरण सदर आंबा फळाला पोषक ठरणारे असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. गतवर्षी आंबा बागायतदारांचे मोठे नुकसान झाले होते, अवकाळी पावसाने आंबा बागायतदारांची झोप उडवली. सर्वसाधारण ऑक्टोबर महिन्यातच्या शेवटी मोहोर येण्यास सुरुवात होते. मात्र, अवकाळी पावसाने फटका दिल्याने मोहोर आल्यानंतर कोसळलेल्या अवकाळी पावसामुळे केलेल्या फवारणीसह आलेल्या मोहोरचे देखील नुकसान झाले होते. त्यानंतर देखील झाडांवर चांगले फळ लागल्यानंतर अवकाळीने फटका दिल्याने फळाना गळती लागून मोठे नुकसान झाले. सद्या आंबा फळासाठी चांगले वातावरण तयार असून थंडी आणि दव यामुळे नुकत्याच केलेल्या पहिल्या फवारणीचा फायदा मोहोर येण्यासाठी लाभदायक होईल अशी आशा आंबा बागायतदारांना वाटत आहे. वातावरणाने अशीच साथ दिली, तर येत्या सात-आठ दिवसांमध्ये दुसऱ्या फवारणीला सुरुवात होईल असे शेतकऱ्यांनी सांगितले आहे.



## राष्ट्रीय हरित सेनेतर्फे विविध कार्यक्रम

**खांब** : रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्री. रा. ग. पोटफोडे (मास्तर) विद्यालय खांब येथील राष्ट्रीय हरित सेना व सामाजिक वनीकरण वन विभाग रोहा यांच्या वतीने खांब येथे विविध प्रकारचे कार्यक्रम संपन्न करण्यात आले. राष्ट्रीय हरित हरित सेना व सामाजिक वनीकरण वन विभाग रोहा यांच्या वतीने येथील विद्यार्थी वर्गासाठी वृक्ष संवर्धन व वृक्ष लागवड या विषयावर आधारित निबंध स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा, वृक्षसंवर्धन, वृक्ष लागवड आदीबाबत विविध प्रकारचे कार्यक्रम संपन्न करण्यात आले. निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.



## पत्रकार दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**रसायनी** : पत्रकार दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ रायगड जिल्हाध्यक्ष अध्यक्ष राकेश खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर तालुका अध्यक्ष अर्जुन कदम यांच्यावतीने रिलायन्स फाऊंडेशन, रिलायन्स इंडस्ट्रीज यांच्यावतीने चौक ग्रामीण रुग्णालयात पॅपस्मिअर तपासणी शिबीर, तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी रुग्णालयाच्या आवारात औषधी वृक्षारोपण करण्यात आले. खालापूर तहसील कार्यालय यांच्याकडून नवीन आधारकार्ड, रेशनकार्ड दुय्यम प्रत देण्यात आली. ग्रामीण रुग्णालय चौक यांच्या सहकाऱ्याने कुपोषित माता बालकांची तपासणी करून रुग्णालय व पत्रकार संघातर्फे पौष्टिक आहार वाटप करण्यात आले. याप्रसंगी पोलीस अधिकारी विशाल पवार, रवींद्र कुंभार, प्रशांत देशमुख, संतोष विचारे, डॉ. रणजित खंदारे, डॉ. विष्णू बुलबुले, डॉ. तेजस्विनी, डॉ. राऊत, डॉ. यादव, माणिक सानप, गणेश मोरे, विश्वास वारे, रामदास काईनकर, जग्गू हातमोडे, विष्णू खैर, प्रकाश जाधव यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलीस पाटीलांची बैठक संपन्न

**पनवेल** : महानगरपालिका निवडणूक व पोलीस वर्धापन दिनानिम्मित पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस पाटील यांची 'रेझिंग डे' आयोजित करण्यात आली होती. यावेळी आयोजित बैठकीत मार्गदर्शन वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांनी बालविवाह रोखण्यासाठी पोलीस पाटलांनी पोलीस ठाण्यात माहिती देण्याबाबत सूचना केल्या. तसेच जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याबाबत माहिती दिली. आगामी निवडणूक जिल्हा परिषद-पंचायत समिती अनुषंगाने मार्गदर्शन केले आहे. नशा मुक्ती, सायबर क्राईम या बद्दल मार्गदर्शन केले. मकर संक्रांत, माघी गणेशोत्सव, २६ जानेवारी, सुरक्षाचे अनुषंगाने मार्गदर्शन केले. तसेच गावातील अडीअडचणीवर चर्चा करून गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला, मुलांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने माहिती दिली. गावातील व परिसरातील संशयित वस्तू, वाहने, इसम याची माहिती देणे. अवैद्य धंद्यांची माहिती देणे. भाडेकरूंची माहिती देणे व सीसीटीव्ही बसविणे बाबत सोसायटी पदाधिकाऱ्यांना माहिती देणे, हेल्पलाइन नंबर - डायल ११२, सायबर क्राईम हेल्पलाइन नंबर - १९३०, १९४५ कोस्टल गार्ड हेल्पलाइन नंबर- १०९३ पोलीस बतावणी बाबत जनजागृती करणे, व्यक्ती, कुटुंब यांना वाळीत टाकणे असा प्रकार होणार नाही याची दक्षता घेणे या बाबत मार्गदर्शन करण्यात आले. सदर बैठकीस ४१ पोलीस पाटील उपस्थित होते.


## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव- थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- अलिबाग कोकोनट रिसॉर्टसाठी वेटर व हाऊसकीपिंग कामासाठी मुलांची गरज आहे. इच्छुकांनी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.+९१९९७००४१५७९ पत्ता: अलिबाग कोकोनट रिसॉर्ट, हॉटेल शालीमारच्या समोर, अलिबाग, रायगड.
- For office in Alibag Vacancy for office staff Attractive salary For interview call 9923750549
- पाहिजेत- अलिबाग येथे ऑफिसमध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर/ ऑफिस असिस्टंट पाहिजे. संपर्क : श्री. मधुकर पाटील ९२७३२८९०१५/९४२०३२५१०६
- अलिबागमधील दुकानात कामासाठी मुलगा अथवा मुलगी हवी आहे. (पार्टटाईम अथवा फुलटाईम) संपर्क : ९४२२६९६२३५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२१९०/ २२२७६१


---

**सार्वजनिक बांधकाम खात्याची मंजुरी** | **सध्या तीन किलोमीटर लांबीचा रस्ता तयार**

# नेरळ-कळंब रस्त्याच्या काँक्रिटीकरण सुरु

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्यावरील अपूर्ण असलेल्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. या रस्त्यावरील १० किलोमीटर लांबीचा रस्ता काँक्रीटीकरण करण्यासाठी ११२ कोटींचा निधी सार्वजनिक बांधकाम खात्याने मंजूर केला आहे. रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे, पण कामाची गती पाहता रस्त्याचे काम निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सुरु केले आहे काय? असा प्रश्न वाहनचालक यांच्यासमोर पडला आहे.



या राज्यमार्ग रस्त्यावर नेरळ रेल्वे फाटक ते निर्माण नगरी आणि पुढे धामोते गावापासून कळंब पोही फाटा असा रस्ता काँक्रीटीकरण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याला ११२ कोटींचा निधी हायब्रीड तत्वावर मंजूर झाला आहे. या रस्त्याच्या कामाला २०२५ मध्ये मंजुरी मिळाली असताना देखील कामाला सुरुवात २०२६ मध्ये झाली. या रस्त्याच्या सध्या साधारण तीन किलोमीटर लांबीचा रस्ता काँक्रीटचा तयार आहे. त्या पुढील रस्ता बनविण्यासाठी जिल्ह्याच्या बाहेरील ठेकेदार आणला गेला आहे. त्यामुळे ठेकेदाराचे चोचले पुरवण्यासाठी रस्त्याचे काम मंजूर आहे काय? असा प्रश्न पडला आहे. या रस्त्याने वाहतूक करणारे वाहनचालकांना गेल्या दिड वर्षांपासून खाडी आणि धुळीचे कणांचा सामना करावा लागत आहे. त्यात रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी टाकण्यात आलेली मातीमुळे दुचाकी चालकांना श्वसनाचे आजार जडले आहेत.

धामोते गावाच्या हद्दीतून रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली असून मागील तीन दिवसांपासून जुना रस्ता खोदकाम केला जात आहे. मात्र, तरीदेखील ५० मीटर लांबीचा रस्ता देखील खोदून झालेला नाही. दरम्यान, आगामी काही दिवसांनी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका लागणार असल्याने रस्त्यावरील धुळीने लोट यामुळे कंटाळलेल्या वाहन चालक यांच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी आणि निवडणूक जुमला म्हणून रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे काय? असा प्रश्न वाहनचालकांना पडला आहे.

वाहनचालकांकडून रस्त्यावर किमान साधे डांबरीकरण करून खड्डे बुजवण्यात यावेत अशी अपेक्षा करण्यात येत होती. मात्र गेली दोन महिने सार्वजनिक बांधकाम विभाग वाहनचालक यांचे हाल पाहत होते. परंतु आता काही दिवसांनी निवडणूक आल्याने सत्ताधारी पक्षाला या खड्डेमय रस्त्याचा मोठा फटका बसू शकतो. हे लक्षात घेऊन नेत्यांनी रस्त्याच्या कामाला सुरुवात केली असल्याचे बोलले जात आहे.

मात्र चार दिवसात केवळ ५० मीटर रस्ता देखील खोदून झालेला नाही आणि त्यामुळे रस्त्याचे काम करणे हा निवडणूक जुमला वाटू लागला आहे.

> "या रस्त्याच्या काँक्रीटीकरणापेक्षा रस्त्यावरील खड्डे चांगल्या पद्धतीने भरण्याची अपेक्षा होती. मात्र, अनेक महिने धूळ खात आम्ही प्रवास करतोय. परंतु, आता निवडणुका जवळ आल्या म्हणून काँक्रीटीकरण कामाला सुरुवात झाली आहे, हे पाहता हा निवडणूक जुमला असून कामाची गती पाहता निवडणूक झाल्यावर पुन्हा काम बंद होण्याची भीती वाटते."
> -संजय विरले, वाहनचालक

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# नवीन पनवेलमध्ये विद्यार्थ्यांची जनजागृती

**नवीन पनवेल :** पनवेल शहर वाहतूक शाखेमार्फत पिल्लई कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स, न्यू पनवेल येथे एनएसएस विद्यार्थ्यांसाठी सडक सुरक्षा, जीवन रक्षा या विषयावर वाहतूक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन वाडेर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या कार्यक्रमात वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील, पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने व तुकाराम कदम, युवराज येळे, अमीर मुलाणी, ज्ञानेश्वर पवार, केशव निकम व हनुमंत आंधळे उपस्थित होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी प्रोजेक्टरद्वारे पीपीटी सादरीकरणातून विद्यार्थ्यांना वाहतूक नियम, रस्ते अपघातांची कारणे, वाहतूक चिन्हे, सिग्नल व प्रतिबंधात्मक उपायांची माहिती दिली. कार्यक्रमात रस्ते सुरक्षा ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, हेल्मेट घाला, जीव वाचवा व वाहतूक नियम पाळा असे महत्त्वाचे संदेश देण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने यांच्या मार्गदर्शनाखाली १५० एनएसएस विद्यार्थ्यांनी वाहतूक नियम पाळण्याची सामूहिक शपथ घेतली. कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय डॉ. शबाब रिझवी, मुख्य एनएसएस कार्यक्रम अधिकाऱ्यांनी केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक सुरक्षिततेबाबत प्रभावी जनजागृती निर्माण झाली.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशील यांना खालील नमुद जमीन मिळकत त्या संबंधीत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

मौजे पानशिळ, तालुका खालापूर, जिल्हा रायगड, दुय्यम निबंधक कार्यालय खालापूर यांचे स्थळ सिमेंतील, तलाठी सजा वासांबे यांचे हद्दीतील हक्क नोंदीस असलेली खालील प्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत :-

| गट नंबर/उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रूपये पैसे |
|---|---|---|
| १०० | ०.४१.००<br>०.१०.०० | ८-९४ |
| | ०.५१.०० | |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतींचे संदर्भात कोणाचाही कसलाही मालकी हक्क, हितसंबंध, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी चार्ज, बक्षीस, ताबा जाण्या-येण्याचा हक्क, वहीवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील नमुद पत्त्यावर माझेशी सकृतदर्शनी लेखी कागदपत्रांसह संपर्क साधावा.

वरील मुदतीत तशा प्रकारची हरकत न आल्यास कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. अथवा तो असल्यास तो माझे अशिल यांचे लाभात सोडून दिलेला आहे असे समजुन आम्ही खरेदीचा व्यवहार पुर्ण करु व मागवुन आलेली कोणतीही तक्रार व हरकत माझे अशीलावर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण खालापूर
दिनांक : ०६/०१/२०२६

ॲडव्होकेट
**तेजस्विनी कैलास वाडेकर**
बि.एल. एस. एल. एल. बी
पत्ता- शॉप नं. ११. अप्पा गोरे संकुल,
खालापुर, ता. खालापुर, जि. रायगड ४१० २०२

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे तळवली, ता. मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) नुरजहाँ अजिज छापेकर, २) समीर अजिज छापेकर, ३) परवेज अजिज छापेकर, ४) दिलनवाज शफी छापेकर, ५) सैफ शफी छापेकर, ६) रफीक शे. अहमद छापेकर, ७) शबाना मिर्झा नाडकर, ८) शाहीस्ता मिनाज हमदुले यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे तळवली, ता. मुरूड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| तळवली ता. मुरूड | २७ | क्षेत्र ०-८९-५०<br>पो.ख. ०-२०-५०<br>एकुण क्षेत्र १-१०-०० | ०.६३ |

वर नमुद मिळकतींपैकी विद्यमान मालक

**१) नुरजहाँ अजिज छापेकर, २) समीर अजिज छापेकर, ३) परवेज अजिज छापेकर, ४) दिलनवाज शफी छापेकर, ५) सैफ शफी छापेकर, ६) रफीक शे. अहमद छापेकर, ७) शबाना मिर्झा नाडकर, ८) शाहीस्ता मिनाज हमदुले यांचा अविभक्त हिस्सा**

दिनांक : ०८/०१/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे. एस. एम कॉलेज जवळ, अलिबाग- रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो.. .माणगाव यांचे न्यायालयात**
**अर्ज क्र.०१/२०२५**

१. मोहमद अकील मोहमद शरीफ बहुर,
रा. गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
गोरेगाव, ग्रामपंचायत गोरेगाव, — सामनेवाले
ता. माणगाव, जि. रायगड
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

श्री. मोहमद अकील मोहमद शरीफ बहुर, रा. गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड यांनी या कार्यालयाकडे केलेल्या अर्जाद्वारे त्यांचा स्वतःचा यांचा जन्म मौजे गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड याठिकाणी दि. ३०/०४/१९७३ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी उपलब्ध नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि. १२/०७/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यानी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे गोरेगाव, ता. माणगाव येथे दि. ३०/०४/१९७३ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम कलम १९६९ चे कलम १३(३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे श्री. मोहमद अकील मोहमद शरीफ बहुर यांच्या जन्माची विलयाने नोंद दाखल होणेकरिता आदेश मिळणेकामी या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. तसेच श्री. मोहमद अकील मोहमद शरीफ बहुर यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत गोरेगाव यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास श्री. मोहमद अकील मोहमद शरीफ बहुर, रा. गोरेगाव, ता. माणगाव यांचा जन्म जन्म दि.३०/०४/१९७३ रोजी मौजे गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : ०५/०१/२०२६

सही/-
**(विपीन लोकरे)**
**कार्यकारी दंडाधिकारी.**
**माणगाव, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिशकुमार, प्रिया फागुलाल बोरकर अशिल रा. ब्लॉक नं. ए १ - ६०३ रोझ राहतम सोसायटी, रोझ व्हॅली कंम्पाउड आत, पिंपले सौदागर, पुणे ४११०२७. यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :- मौजे - नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|
| | | हे.आर.चौ.मी | रुपये | पैसे |
| १) श्री. महेश गजानन ठाकरे<br>२) श्री. मनोहर सदाशिव ठाकरे<br>३) श्री. नितीन किसन बडेकर | ३७/६ | १-०२-०० | ० | ७२ |

**वरील जमीन मिळकतींपैकी खरेदी देणार यांचे हिश्याचे मिळकतीपैकी ०.२०.०० हे.आर.चौ.मी इतके क्षेत्र**

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता:-ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला,
गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. निलेश दामु मुंढे**
दिनांक : ०८/०१/२०२६
मो. नं. ८४४६८६९६७१
ई मेल : nileshmundhe029@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे खांडपे ता. कर्जत जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील गोकुलदास झिपरू खडे हे रंभाजी गणु घारे, मनिषा संतोष कर्णुक आणि आशा राजेश कर्णुक या विद्यमान मालकाकडुन खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं हिस्सा नं | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ३७/४ | १-२२-५० गुंठे पैकी<br>०-४३-०० गुंठे | ११-०३ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारस हक्क, पोटगी, लीजचार्ज, ताबा, वहीवाट, अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसाच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
०८/०१/२०२६
मो. नं ९२८४६७७५१६

आशीलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु. पो कोंदीवडे ता कर्जत
जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे मुगपे ता. कर्जत जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील ज्ञानेश्वर अर्जुनराव साबणे हे बनाबाई महादु पवार या विद्यमान मालकाकडुन खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| २९ | २ | ०-८०-०० गुंठे | ७-६८ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारस हक्क, पोटगी, लीजचार्ज, ताबा, वहीवाट, अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत नोंदवावी.सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
०८/०१/२०२६
मो. नं ९२८४६७७५१६

आशिलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु. पो कोंदीवडे ता कर्जत
जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे सावरगाव, ता: कर्जत, जि : रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे सावरगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं/ हिस्सा नं | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १. श्री. मोहम्मद नकि अहमद हुसेन सय्यद<br>२. मोहम्मद शाहीद इनायत उल्लाह सिद्दीकी<br>३ सबिराली यादअली शाह<br>४.मोहम्मद शरीक अब्दुल हई खान | ५८ | ०-२३-३० | २.७५ |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार,खरेदीखत, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहीवाट, इजमेंट, बोजा तारण,वारसा ट्रस्ट,कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसाचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०८/०१/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. महेश कमलाकर थोरवे**
रा. कर्जत ता. कर्जत जि.रायगड
मो.नं.८००७५३७६५६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे उक्रुळ, ता कर्जत जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे: उक्रुळ, ता: कर्जत, जि : रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | गट नं | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| श्री. नारायण मारूती पडवळ | ७१/४अ | ०-२३-०० | २.४४ |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, खरेदीखत,पोटगी, चार्ज, बक्षिस, वहीवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसाचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०८/०१/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. महेश कमलाकर थोरवे**
रा. कर्जत ता. कर्जत जि.रायगड
मो.नं.८००७५३७६५६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. कवठेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. वाळकू गोपाळ हरपुडे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे आर-पॉ) | आकार(रू.पै) |
|---|---|---|---|
| २४ | २ | २-६२-०<br>यापैकी विकत दिलेले क्षेत्र<br>०-२६-५३ | १-४९ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/०१/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्रीम. रंजना दिनेश वळवी यांनी १. श्री नामा उर्फ नाथा गिरजू झुगरे, २. श्री.विठ्ठल गिरजू झुगरे,३ श्रीम.सरिता उर्फ कल्पना हरिशचंद्र उर्फ हरिचंद्र निरगुडा यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे झुगरेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ३५ | २ | ६.०३.०० | ४.०६ |

पैकी विकी दिलेले क्षेत्र ४.००.०० हे. आर. पॉ.
तदंगभुतः सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबाकबजा, कुळ वहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी- हक्क, मृत्यूपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृत दर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख - ०८-०१-२०२६

**ॲड. दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस,एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो. नं - ९५६१७१९४९४
९०११७१६००१

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे खांडपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक साधना राजू मोरे यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे खांडपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर. पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ३१ | ५ | ०-१९-६० | ०-६३ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०८/०१/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. कवठेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. वाळवू गोपाळ हरपुडे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे आर-पॉ) | आकार(रू.पै) |
|---|---|---|---|
| २४ | २ | २-६२-०<br>यापैकी विकत दिलेले क्षेत्र<br>०-१६-० | १-४९ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/०१/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

## PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that we are investigating the right, title and interest of Mr. Milind Gajanan Chavan in all that piece and parcel of agricultural land lying being and situate at Village Nagaon, Taluka Alibaug, District Raigad, more particularly described in the Schedule hereunder written (hereinafter referred to as the “Property”).

ALL persons/entities having or claiming to have any share, right, titleclaim or interest in respect of the Property more particularly described in the Schedule hereunder written whether by way of sale, transfer, assignment, exchange, let, lease, license, mortgage, (equitable or otherwise) inheritance, occupation, gift, lien, charge, development rights, maintenance, easement, trust, covenant, or condition, release relinquishment or any other method through any agreement, contract, deed, document, writing, conveyance deed, bequest, succession, family arrangement/settlement, litigation, decree, or order or award of any court of law or tribunal or revenue or statutory authority or arbitration or otherwise howsoever of any nature whatsoever into out of or upon the Property or any part thereof, are hereby requested to make the same known in writing, along with supporting documentary evidence, to the undersigned at the address mentioned below within 14 (fourteen) days from the date hereof, failing which the transaction shall be completed without reference to such claim/claims and the claims, if any, of such persons/entities shall be treated as waived and not binding on our clients.

**THE SCHEDULE HEREINABOVE REFERRED TO**

All that piece and parcel of agricultural land bearing Bhumapan No. & Upvibhag 2052 admeasuring Jirayat Area 1-09-70 H-R-P Pot Kharaba 0-01-30 H-R-P aggregating to 1-11-00 H-R-P, assessed at Rs. 19.76/-, lying being and situate at Village Nagaon, Taluka Alibaug, District Raigad.

Alibag
Date :08.01.2026

**Simran Aditya Sathe**
Advocate
501, Acropolis CHS, Sector 6,
Plot No.28, Nerul West,
Navi Mumbai 400 706

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीस द्वारे कळविण्यात येते की, मौजे - वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची वरकस शेतजमिन मिळकत १) सौ. लता अरूण ठाकूर २) सौ.नम्रता नंदकुमार घरत, रा. मु.पो. चौल तुलाडदेवी, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या खुद्द मालकीची असून सदरील वरकस शेतजमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वरंडे ता. अलिबाग | ४४२ | वरकस क्षेत्र ०-१२-००<br>एकूण क्षेत्र ०-१२-०० | ०.२८ |

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, मृत्यूपत्र वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून सात (०७) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०७/०१/२०२६

सही /-
**ॲड. प्रविण कृष्णा झेंडेकर**
मु. शिंत्रे गल्ली, पो. आक्षी,
ता. अलिबाग, जि. रायगड
खरेदीदाराचे वकील

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## शुद्धीपत्रक

बुधवार दि. २४.१२.२०२५ रोजी कृषिवल वर्तमानपत्रात शहर वार्ता पान नं ७ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये सौ वंदना नं तासगावकर आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्र चांधई कर्जत रायगड येथील महाविद्यालयाने Requirment of Teaching Faculty सदराखाली दिलेल्या पदांमध्ये खालीलप्रमाणे बदल/शुद्धी गृहित धरण्यात यावेत व त्याच्या अनुसार सदर महाविद्यालयामध्ये दि.२०.०१.२०२६ रोजी सकाळी ९.०० वा मुलाखतीसाठी शिक्षक उमेदवारांनी उपस्थित रहावे संबंधिताने याची नोंद घ्यावी.

**Requirment of Teaching Faculty**

**Applications are invited for filling up the following posts in the College / Institute.**

| Sr. No. | Subject/Dept | Professor | Associate Professor/ | Assistant Professor/ |
|---|---|---|---|---|
| 1 | Principal | | 1 (Open) | |
| 2 | Kriya sharir | 1 (Open) | | |
| 3 | Rachana sharir | | 1 (Open) | 1 (Open) |
| 4 | Ayurveda Samhita-Siddhant | | 1 (Open) | 2 (1 Open, 1 SC) |
| 5 | Rasashastra & Bhaishajya kalpana | | 1 (Open) | 1 (Open) |
| 6 | Rog nidan Avam Vikrutu Vigyan | | 1 (Open) | |
| 7 | Swasthavritta & Yoga | | | 1 (Open) |
| 8 | Agad Tantra | | 1 (Open) | 1 (Open) |

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**कार्यकारी अभियंता, खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण, जि. रायगड,**
**ई- निविदा सूचना क्रमांक ०७ सन २०२५-२६**

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत रुपये (उपकर व रायल्टी इ. कर अंतर्भुत) |
|---|---|---|
| १) | आरे खुर्द आरे बुद्रुक खारभूमी योजना, ता. रोहा, जि. रायगड, खारगांव खारभूमी योजना, ता. रोहा, जि. रायगड, मुरुड अंबोली खारभूमी योजना, ता. मुरुड, जि. रायगड, साळाव खारभूमी योजना, ता. मुरुड, जि. रायगड व शिरगांव येसदे खारभूमी योजना, ता. मुरुड, जि. रायगड या योजनांचे बांधकाम, जमृतखार खा. भू. यो. ता. मुरुड, जि. रायगड, न्हावे नवखार खा. भू. यो. ता. रोहा, जि. रायगड, टोकेखार खा. भू. यो. ता. मुरूड, जि. रायगड, वाणदे खा. भू. यो. ता. मुरूड, जि. रायगड, मुरूड आंबोली खा. भू. यो. ता. मुरूड, जि.रायगड, शिरगांव येसदे खा.भू. यो. ता. मुरूड, जि. रायगड, कुंभोशी खा. भू. यो. ता.रोहा, जि. रायगड, आरे खु. आरे. बु. खा. भू. यो. ता. रोहा, जि. रायगड, खारखर्डी खा. भू. यो. ता. रोहा, जि. रायगड, खारगांव खा. भू. यो. ता. रोहा, जि. रायगड | ४,३४,२८,३५९/- |
| २) | झोळांबे खारभूमी योजना ता. रोहा, बोरकस कोठा खारभूमी योजना ता. रोहा, पळस खारभूमी योजना ता. रोहा., वराठी चिंभावे बेबलघरखारभूमी योजना. ता. महाड, जि. रायगड, तेलंगे खारभूमी योजना. ता. महाड, गोमेंडी खारभूमी योजना. ता.महाड, बराठी चिभावे देवघर खारभूमी योजना. ता. महाड, जि. रायगड, गिरणे-नाणवली खारभूमी योजना ता. तळा., वाशी हवेली खारभूमी योजना ता.तळा, सानेगांव खारभूमी योजना ता. रोहा, बोरकस कोठा खारभूमी योजना ता रोहा, पळस खारभूमी योजना ता. रोहा., अन्नपुर्णा खारभूमी योजना ता. रोहा, जिल्हा :- रायगड. | ३,५६,१५,५७१/- |

निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ०८.०१.२०२६ ते १५.०१.२०२६ पर्यंत
ई निविदा उघडणे :- दिनांक १६.०१.२०२६
सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास खालील वेबसाईटवर कळविण्यात येईल.
http://mahatenders.gov.in

सही/-
**(वि पां पाटील)**
**कार्यकारी अभियंता,**
**खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण- रायगड.**

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की तलाठी सजा कासु हद्दीतील मौजे पाटणी पांडापुर, ता.पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री.मारुती सखाराम पाटील यांनी त्याचे नमुद यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री.मोरेश्वर नागु (नाग्या) तांडेल यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./ गट नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| पाटणी पांडापुर | १३९/३ | ०.३३.६० | ५.१३ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.
टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण: पेण
दि.०८/०१/२०२६

सही /-
**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो. नं.९७६२३१८९९९

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# एमसीएय निवडणूकीला 'उच्च' स्थगिती

| मुंबई | प्रतिनिधी |

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन निवडणुकीतील कोर्टात प्रलंबित सभासदांच्या यादीवरील आक्षेप प्रकरणासंदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. त्यामुळे या निवडणुकीला आता मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. या प्रकरणी क्रिकेटपटू केदार जाधव यांनी निवडणुकीविरोधात मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली असून पुणे येथील सर परशुरामभाऊ कॉलेजने देखील स्वतंत्र याचिका दाखल करुन निवडणुकीला आव्हान दिल आहे. परिणामी, निवडणुकीसाठी नव्याने समावेश केलेल्या मतदारांवर याचिकेत आक्षेप घेण्यात आला आहे. तसेच, निवडणूक नियमानुसार होत नसल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आला आहे. नव्याने समावेश केलेले ४०० मतदार बाद करून प्रस्तावित मतदार यादी तसेच निवडणूक रद्द करण्याचीही याचिकेत मागणी करण्यात आली आहे. तर, पारदर्शक निवडणुकीसाठी प्रशासक नेमण्याची देखील याचिकेत मागणी करण्यात आली आहे.

# मंगळवार ठरला क्रिकेटप्रेमींसाठी रोमांचक

- मुंबईचा हिमाचल प्रदेशवर विजय
- महाराष्ट्र, विदर्भ संघाकडून निराशा

| जयपूर | वृत्तसंस्था |

विजय हजारे चषक स्पर्धेतील मंगळवारचा दिवस महाराष्ट्रातील तिन्ही संघांसाठी रोमांचक ठरला. मुंबईने शेवटच्या क्षणी विजय मिळवला, तर महाराष्ट्राला मात्र पराभवाचा सामना करावा लागला. विदर्भ संघही फार काही कमाल दाखवू शकला नाही, त्यांनाही पराभूत व्हावे लागले. यादरम्यान, मंगळवारी विविध स्टार खेळाडू मैदानात होते. त्यातील काही खेळाडू चमकले, तर काहींसाठी हा दिवस फारसा खास ठरला नाही.

यावेळी मुंबईने हिमाचल प्रदेशविरुद्ध ७ धावांनी रोमांचक विजय मिळवला. जयपूरला झालेला हा सामना पावसामुळे ३३-३३ षटकांचा करण्यात आला होता. या सामन्यात मुंबईने ३३ षटकांत ९ बाद २९९ धावा करत हिमाचलसमोर ३०० धावांचे मोठे लक्ष्य ठेवले होते. मुंबईकडून कर्णधार श्रेयस अय्यरने ५३ चेंडूत ८२ धावांची दमदार खेळी केली. तसेच, मुशीर खाननेही ५१ चेंडूत ७३ धावा केल्या. मात्र, मुंबईचे स्टार फलंदाज यशस्वी जैस्वाल १५ धावा, सूर्यकुमार यादव २४ धावा आणि शिवम दुबे २० धावा करून स्वस्त्यात बाद झाले. यावेळी हिमाचल प्रदेशकडून वैभव अरोरा आणि अभिषेक कुमार यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले. त्यानंतर मुंबईने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना हिमाचल प्रदेशने ३२.४ षटकांत सर्वाबाद २९२ धावांपर्यंत मजल मारली. मात्र, विजयपासून ते थोडक्यात दूर राहिले. हिमाचल प्रदेशकडून मुखराज मन ६४ धावा, अंकुश बैन्स ५३ धावा व मयंक डागर ६४ धावा केल्या. तसेच, अमनप्रीत सिंगने ४२ धावा केल्या. परंतु, शेवटच्या षटकांमध्ये मुंबईच्या गोलंदाजांनी घेतलेल्या बळींमुळे हिमाचल प्रदेशला पराभवाचा सामना करावा लागला. मुंबईकडून गोलंदाजी करताना शिवम दुबेने ४ बळी घेतले. तर, साईराज पाटीलने २ आणि तुषार देशपांडे, शम्स मुलानी व मुशीर खान यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.





त्यानंतर जयपूरलाच झालेल्या सामन्यात महाराष्ट्राला छत्तीसगढविरुद्ध ६ धावांनी लाजीरवाणा पराभव स्वीकारावा लागला. पावसामुळे ३१-३१ षटकांचा करण्यात आलेल्या या सामन्यात महाराष्ट्राने नाणेमफेक जिंकून छत्तीसगढला प्रथम फलंदाजीसाठी बोलावले होते. त्यामुळे प्रथम फलंदाजी करताना छत्तीसगढला २९ षटकांत सर्वबाद १६६ धावाच करता आल्या. त्यांच्याकडून आयुष पांडेने ४९ धावांची खेळी केली, तर, विकल्प तिवारीने २२ धावा केल्या. याशिवाय बाकी कोणाला २० धावांचाही टप्पाही पार करता आला नाही. महाराष्ट्राकडून गोलंदाजी करताना प्रदीप धंदे आणि विकी ओत्सवाल यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले. तर, राजवर्धन हंगारगेकर आणि सत्यजीत बच्छाव यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. यावेळी छत्तीसगढने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना महाराष्ट्राचा सलामीवीर पृथ्वी शॉ २ धावांवरच बाद झाला. तसेच, अंकित बावणे १४ धावांवर परतला. मात्र, अर्शिन कुलकर्णीने या सामन्यातही चांगली कामगिरी करताना ६६ चेंडूत ६७ धावांची खेळी केली. तर, सिद्धेश वीर २३ धावा बाद झाला. त्यानंतर ऋतुराज गायकवाडने आक्रमक फलंदाजी करत १५ चेंडूत २२ धावा केल्या. रामकृष्ण घोषही ७ धावांवर माघारी परतला. निखिल नाईक ६ धावांवर बाद झाला. तर, विकी ओत्सवाल शुन्य धावा करून बाद झाला. शेवटी महाराष्ट्राला ३१ षटकांत ८ बाद १६० धावाच करता आल्या. यावेळी सत्यजीत बच्छाव १२ धवांवर आणि राजवर्धन हंगारगेकर १ धावेवर नाबाद राहिले. छत्तीसगढकडून रवी किरणने ३ बळी घेतले. तसेच, अजय मंडलने २, तर मोहित राऊत आणि विकल्प तिवारी यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

त्यानंतर तिसरा सामना राजकोटमध्ये विदर्भ विरुद्ध उत्तर प्रदेश यांच्यात झाला. या सामन्यात उत्तर प्रदेशने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ५ बाद ३३९ धावा ठोकल्या होत्या. उत्तर प्रदेशकडून अभिषेक गोस्वामीने १०३ धावांची खेळी केली. तसेच, ध्रुव जुरेलने ५६ धावांची, तर प्रियम गर्गनेही ६७ धावांची खेळी केली. कर्णधार रिंकु सिंगने ५७ धावा केल्या आणि तो रिटायर्ड हर्ट होऊन मैदानातून बाहेर गेला. विदर्भाकडून गोलंदाजी करताना नचिकेत भुते, यश ठाकूर, पार्थ रेखाडे आणि हर्ष दुहे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. त्यानंतर उत्तर प्रदेशने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना विदर्भाचा डाव ५० षटकांत ९ बाद २८५ धावांवरच संपला. त्यामुळे उत्तर प्रदेशने ५४ धावांनी विजय मिळवला. विदर्भाकडून अमन मोखाडेने ११७ चेंडूत १४७ धावा केल्या होत्या. त्याने १७ चौकार आणि २ षटकार मारले. त्याच्याशिवाय अक्षय वाडकरने नाबाद ५१ धावा केल्या. परंतु, बाकी कोणीही खास काही करू शकले नाहीत. उत्तर प्रदेशकडून कुलदीप यादवने ३ बळी घेतले. कार्तिक त्यागी आणि विपराज निगम यांनी प्रत्येकी २, तर प्रशांत वीर आणि झिशान अन्सारी यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

## निवडक



### संमेलन पेक्षा क्रीडा स्पर्धांना प्राधान्य

**कोलाड** : रोहा तालुक्यातील ज्ञानांकुर इंग्रजी माध्यम शाळा खांब येथे तीन दिवसीय क्रीडा महोत्सव उत्साही वातावरणात संपन्न झाला. पारंपारिक स्नेहसंमेलन व सहलीपेक्षा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला अधिक प्रभावी ठरणाऱ्या क्रीडा संस्कारांना प्राधान्य देण्याचा ठाम निर्णय शाळेने घेतला. त्यामुळे या निर्णयाला पालक, शिक्षक, तसेच विद्यार्थ्यांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. आधुनिक काळात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान उपयुक्त नाही. तर, विद्यार्थी शारीरिक दृष्ट्या सक्षम, मानसिक दृष्ट्या सशक्त आणि नैतिक दृष्ट्या सजग असणे आवश्यक आहे. खेळ विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि नेतृत्व गुण देतो. स्पर्धेतील अपयश हे निराशेचे कारण नसून पुढील यशाची पहिली पायरी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल या उद्देशाने क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्घाटन कोलाड पोलीस निरीक्षक निलेश महाडिक, उपनिरीक्षक नरेश पाटील, लायन्स क्लबचे आर. पी. पांडे, रायगड जिल्हा कबड्डी सदस्य जनार्दन पाटील, निवृत्त शिक्षक धनवी, तळवली सरपंच रविंद्र मरवडे, खांब सरपंच सुरेखा पार्टे, उपसरपंच संतोष टवले यांच्या उपस्थित झाले.



### डॉग शोमध्ये अलिबाग प्रथम

**खारेपाट** : सावन फाऊंडेशन कोल्हापूर तर्फे ओपन डॉग शोचे आयोजन करण्यात आले होते. त्यात अलिबाग तालुक्यातील आवास येथील सामाजिक कार्यकर्ते रणजीत राणे यांच्या पाळीव कुत्र्याने कोल्हापूरच्या डॉग शोमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला आहे. मॅरेथॉन किंवा धावणे अशा अनेक मानवी स्पर्धा सर्वत्र होत असतात; परंतु, पशुपक्षी किंवा पाळीव प्राण्यांनाही चांगले शिक्षण दिल्यास ते देखील या स्पर्धा खेळू शकतात हे यावरून अधोरेखित झाले. दरम्यान, अलिबाग तालुक्यासह जिल्ह्यातील विविध पाळीव प्राणी संघटना व संस्थाकडून रणजीत राणे यांचे कौतुक होत आहे.

### आयएसएलच्या तारखांची घोषणा

**नवी दिल्ली** : केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडविया यांनी मंगळवारी इंडियन सुपर लीगच्या आगामी हंगामाच्या तारखांची मंगळवारी (दि.६) अधिकृत घोषणा केली. आयएसएलचा नवा हंगाम १४ फेब्रुवारीपासून सुरू होणार असून, सर्व १४ क्लब या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. व्यावसायिक भागीदारांच्या कमतरतेमुळे आयएसएलचा हंगाम अद्याप सुरू होऊ शकला नव्हता. त्यामुळे गेल्या काही काळापासून लीगच्या आयोजनावरून वादही निर्माण झाले होते. अखिल हिंदुस्थानी फुटबॉल महासंघाने नुकतेच आयएसएलच्या तारखांची घोषणा आगामी आठवड्यात केली जाईल, असे संकेत दिले होते. त्यानुसार आता अधिकृत घोषणा झाल्याने अनिश्चिततेचे सावट दूर झाले आहे. सरकार, फुटबॉल महासंघ तसेच मोहन बागान, ईस्ट बंगालसह १४ क्लब्जची संयुक्त बैठक झाली. या बैठकीत आयएसएल १४ फेब्रुवारीपासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# रायगड जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी

| रसायनी | प्रतिनिधी |

पुण्यातील देवाची उरुळी येथील द इन्फिनिटी स्कूलमध्ये महाराष्ट्र राज्य आईस स्टॉक स्पोर्ट्स चॅम्पियनशिपचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा आईस स्टॉक स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ पुण्याचे अध्यक्ष श्रीकांत सोमसे, सचिव अक्षता वीरकर व टेक्निकल डायरेक्टर सुनील कदम यांच्या उत्कृष्ट नियोजनाखाली पार पडली. या स्पर्धेचे उद्घाटन प्रशांत सातव व प्रवीण सातव यांच्या हस्ते पार पडले. ही स्पर्धा शिस्तबद्ध व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी संदेश, प्रवीणसिंह कोळी, यश सरनाईक व गायत्री यांनी पंच म्हणून अत्यंत जबाबदारीने काम पाहिले. या स्पर्धेत स्पर्धेत पनवेल-रायगड, पुणे, सातारा, सांगली, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, कोल्हापूर इत्यादी ठिकाणांहून सुमारे अडीचशेहून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.

आईस स्टॉक स्पोर्ट्स चॅम्पियनशिप स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील ११ खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. त्यापैकी ९ खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत घवघवीत यश संपादन केले आणि चौथ्या क्रमांकाचे चषक पटकावले. त्यामुळे ही बाब रायगड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरली आहे. रायगड जिल्ह्याच्या संघाचे नेतृत्व जिल्हा प्रतिनिधी म्हणून भूपेंद्र गायकवाड व संस्कृती घरत यांनी केले. तर, टीम को-ऑर्डिनेटर म्हणून बिपीन जाधव यांनी संघ व्यवस्थापनाची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली.

यावेळी संस्कृती घरत यांनी खेळाडूंना मानसिक बळ, शिस्त व स्पर्धात्मक आत्मविश्वास देत उत्कृष्ट मार्गदर्शन केले. तसेच, भूपेंद्र गायकवाड यांनी आपल्या अनुभवसंपन्न नेतृत्वातून, काटेकोर नियोजनातून व खेळाडूंवरील वैयक्तिक लक्षातून संघाला प्रेरणा दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच रायगड जिल्ह्याच्या संघाने राज्यपातळीवर आपली ठसठशीत छाप पाडली. दरम्यान, रायगड जिल्ह्याचे विजयी खेळाडू प्रमोद ठोंबरे, यश मोरे, संस्कृती घरत, धनेशा शिंगोटे, हुजेफा लकडावाला, तन्वी शेलार, निसर्गा गवळी, साक्षी ननावरे आदींसह मार्गदर्शक, समन्वयक व पालकवर्गाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. तसेच, रायगड जिल्हा भविष्यात आईस स्टॉक स्पोर्ट्समध्ये आणखी मोठी उंची गाठेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# न्यूझीलंड संघाची घोषणा

| नवी दिल्ली| वृत्तसंस्था |

अगामी टी-२० विश्वचषकासाठी न्यूझीलंड संघाची घोषण करण्यात आली असून यंदा मिचेल सॅन्टनरकडे संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले आहे. तसेच, संघात धडाकेबाज सलामीवीर फिन ॲलनची देखील एन्ट्री झाली आहे. विशेष म्हणजे या १५ सदस्यीय संघातील पाच खेळाडू दुखापतग्रस्त आहेत. या संघात मिचेल सॅन्टनर (कर्णधार) व फिन ॲलनसह मायकेल ब्रेसवेल, मार्क चॅपमन, डेव्हॉन कॉनवे, जेकब डफी, लॉकी फर्ग्युसन, मॅट हेन्री, डॅरिल मिचेल, ॲडम मिल्ने, जेम्स नीशम, ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, टिम सिफर्ट, ईश सोढीट्रॅव्हलिंग, राखीव: काइल जेमिसन यांचा समावेश आहे.

# श्री कृपा शिरवली संघ विजेता





| खारेपाट | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यात अमित दादा नाईक मित्र मंडळ पुरस्कृत व आद्य नाईक प्रतिष्ठान आयोजित भव्य खारेपाट लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत श्रीकृपा शिरवली संघ विजेता ठरला असून १ लाख ११ हजार रुपये रोख रक्कम व चषक मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. तसेच, द्वितीय क्रमांक जय हनुमान संघ ठरला असून ७७ हजार ७७७ रुपये रोख रक्कम व चषक, तृतीय क्रमांक मिहान कलेक्शन पेढांबे संघाला ५५ हजार ५५५ रोख रक्कम व चषक, तर श्री गणेश सात घर संघाला देखील ५५ हजार ५५५ रुपये रोख रक्कम व चषक मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. त्याचबरोबर उत्कृष्ट गोलंदाज हरिकेश माळी, उत्कृष्ट फलंदाज मोहित डाकी, सर्वोत्कृष्ट खेळाडू रोशन पाटील यांच्यासह उल्लेखनीय खेळी केलेल्या खेळाडूंचा सन्मान अमित नाईक यांच्या हस्ते करण्यात आला.

# भारतात खेळा नाहीतर गुण गमवा

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारत बांगलादेश यांच्यातील संबंधात तणाव निर्माण झाल्याने कोलकाता नाईट रायडर्सने बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रेहमानला करारमुक्त केले आहे. यावरून मोठा वाद निर्माण झाला असून या निर्णयानंतर बांगलादेशने भारतात टी-२० विश्वकप खेळण्यासही नकार दिला असून त्यांनी आयसीसीला प्रत्र लिहिले आहे. भारतातील सामने श्रीलंकेत खेळवावे, अशी मागणी बांगलादेशकडून करण्यात आली आहे. मात्र, ही मागणी आयसीसीने फेटाळली असल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि.६) बांगलादेश क्रिकेट बोर्डाची आयसीसीच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठक पार पडली. यावेळी बांगलादेश क्रिकेट बोर्डाने खेळाडूंच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करत भारतात खेळण्यास नकार दिला. आमचे सामने भारताऐवजी श्रीलंकेत खेळवण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. मात्र, आयसीसीने त्याला स्पष्ट नकार देत त्यांची ही मागणी फेटाळून लावली आहे. भारतात विश्वचषक खेळा नाहीतर गुण गमवा, असा स्पष्ट इशारा आयसीसीकडून देण्यात आला आहे. त्यामुळे बांगलादेश संघाला भारतात येण्याशिवाय कोणताही पर्याय नाही. बांगलादेशचे पहिले तीन सामने वेस्ट इंडिज, इटली आणि इंग्लंडविरुद्ध अनुक्रमे ७, ९ आणि १४ फेब्रुवारी रोजी कोलकातामध्ये होणार आहेत. त्यानंतर १७ फेब्रुवारी रोजी त्यांचा नेपाळविरुद्ध सामना असून हा सामना मुंबईत होणार आहे.

# पेंचक सिलटमध्ये क्रीनाशीला कांस्य

| दीव | क्रीडा प्रतिनिधी |

खेलो इंडिया बीच स्पर्धेतील दुसरा दिवस महाराष्ट्रासाठी संमिश्र यशापयशाचा ठरला. बीच पेंचक सिलटमध्ये मुंबईच्या क्रीनाशी येवलेने सलग दुसऱ्या वर्षी कांस्यपदकाची कमाई केली. महिलांच्या बीच कबड्डीत हरियाणाकडून ४७-२६ गुणांनी महाराष्ट्र पराभूत झाला तर बीच सॉकरमधील साखळीतील सलग दोन पराभवामुळे महिला संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

दीवमधील घोघला समुद्र किनाऱ्यावर रंगलेल्या बीच पेंचक सिलटमध्ये महाराष्ट्राने विजयी घोडदौड सुरू केली आहे. तुंगल प्रकारातील उपांत्यूपूर्वफेरीत मुंबईच्या क्रीनाशी येवलेने कर्नाटकच्या रिशीकाला ३७५-३६८ गुणांनी पराभूत केले. क्रीनाशीने उपांत्य फेरीत धडक मारल्याने महाराष्ट्राचे स्पर्धेतील पहिले पदक निश्चित केले होते. उपांत्य लढतीत मध्यप्रदेशच्या भूमिका जैनने ४०७-४१३ गुणांनी बाजी मारली. क्रीनाशीला भूमिकाने पराभूत केल्याने तिला कांस्यपदकवर समाधान मानावे लागले. क्रीनाशीचा सराव मुंबईत व कोपरखैरणे येथे वडिल किशोर येवले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असतो. गतस्पर्धेत बीच पेंचक सिलटमध्ये महाराष्ट्राने ३ सुवर्ण, ४ रौप्य व ५ कांस्य अशी एकूण १२ पदकांची कमाई करीत वर्चस्व गाजवले होते.





बीच कबड्डीत धडकेबाज सलामी दिल्यांनतर महिला गटात हरियाणाकडून महाराष्ट्रला २१ गुणांनी पराभव स्वीकारावा लागला. सुरूवातीपासून हरियाणाच्या उंचपुऱ्या मुलींनी वर्चस्व प्रस्थापित केले. पूर्वार्धात २३-१४ निर्धायक आघाडी घेतल्यानंतर उत्तरार्धातही हरियाणाच्या बोलबाला दिसून आला. महाराष्ट्राकडून पूजा यादव, हर्षा शेट्टी, पौर्णिमा जेधेची झुंज अपयशी ठरली. २६-४७ गुणांनी महाराष्ट्राला मोठा पराभव स्वीकारावा लागला. आता बुधवारी शेवटच्या साखळी लढतीत पंजाब विरूध्द महाराष्ट्रांची निर्णायक लढत रंगणार आहे. तसेच, बीच सॉकरमधील साखळीतील सलग दोन पराभवामुळे महाराष्ट्राचा मुलींचा संघाचे आव्हान संपुष्टात आले आहे. सलामीच्या लढतीत ओरिसाने महाराष्ट्राला ११-३ गोलने तर दुसऱ्या सामन्यात अरूणाचल प्रदेशकडून १ -९ गोलने महाराष्ट्राला पराभूत व्हावे लागले. गतवर्षी कांस्यपदकाची कमाई करणारा बीच सॉकरमधील पुरूष संघ यंदा सुवर्णपदकासाठी सज्ज झाला आहे.

**तीन जिल्ह्यांतील महाविद्यालयांचा समावेश | स्पर्धेत ५० मुले, ३० मुलींचा सहभाग**

# आंतरमहाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धा संपन्न

| तळा | प्रतिनिधी |

मुंबई विद्यापीठ अंतर्गत तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग. तटकरे महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने कोकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांतील मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेली एकूण २१ महाविद्यालये सहभागी झाली होती. यामध्ये १३ मुलांच्या तर ८ मुलींच्या महाविद्यालयांचा सहभाग होता. यावेळी एकूण ८० खेळाडूंनी सहभाग नोंदविला असून त्यामध्ये ५० मुले व ३० मुली सहभागी होत्या.



या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी अध्यक्ष चंद्रकांत रोडे यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष मंगेश देशमुख, मुंबई विद्यापीठ कोकण विभागाचे सहसचिव व समन्वयक शशांक उपशेटे, कोकण विभाग समिती सदस्य रामचंद्र कदम, प्राचार्य भगवान लोखंडे, विविध महाविद्यालयातील क्रीडा शिक्षक, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी क्रॉस कंट्री मुले वैयक्तिक स्पर्धेत प्रथम क्रमांक स्वराज जोशी (चिपळूण), द्वितीय क्रमांक संदीप जोयशी (महाड), तर तृतीय क्रमांक शिवम कुलाल (लांजा) यांनी पटकाविला. मुलींमध्ये प्रथम क्रमांक निशा कुदळे (लांजा), द्वितीय क्रमांक ऐश्वर्या लोंढे (रत्नागिरी) व तृतीय क्रमांक हर्षदा पांचाल (लांजा) यांनी मिळविला. तसेच, संघ अजिंक्यपद मुलींमध्ये प्रथम क्रमांक ए.सी.एस. महाविद्यालय (लांजा), द्वितीय क्रमांक गोगटेजोगळेकर महाविद्यालय (रत्नागिरी) आणि तृतीय क्रमांक डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय (महाड) यांनी पटकविला आहे. तर मुलांमध्ये प्रथम क्रमांक ए.सी.एस. महाविद्यालय (लांजा), द्वितीय क्रमांक गोगटेजोगळेकर महाविद्यालय (रत्नागिरी) व तृतीय क्रमांक डी.बी.जे. महाविद्यालय (चिपळूण) यांनी पटकविला आहे.

स्पर्धेदरम्यान, भगवान लोखंडे यांनी तटकरे महाविद्यालयाच्या थोडक्यात प्रगतीचा आढावा घेतला. या प्रसंगी क्रीडा शिक्षक विजय तरटे, कसबे, मुंबई विद्यापीठ कोकण विभागाचे सहसचिव तथा समन्वयक श्री शशांक उपशेटे, उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे, कार्यक्रमाचे अध्यक्ष मंगेश देशमुख यांनी खेळाडूंना क्रीडा विषयक उत्तम मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. डॉ. तृप्ती थोरात यांनी, तर आभार प्रदर्शन डॉ. थोरात यांनी उत्तम प्रकारे केले. बक्षीस समारंभानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)